बी.एम. प्रतिष्ठान
बी. एम. प्रतिष्ठान
महाराष्ट्र राज्य
संस्थापक अध्यक्ष
बाळासाहेब भगवानराव मस्के

दैनिक बीड
# पुण्यभूमी
संपादकःबाळासाहेब मस्के

बीड | बुधवार,दि.३१जुलै २०२४ | वर्ष४रे | अंक२ला | पाने ६ | दररोजच्या घडामोडीसाठी वाचत रहा... | https://Paper.epunyabhumi.in | RNI No : MAHAMAR/2021/81902 | ₹ ३

## राज्य महामार्गाला तलावाचे स्वरुप

सिरसाळा/पुण्यभूमी प्रतिनिधी

येथील परळी – बीड राज्य महामार्गाला अक्षरशा साठवण तलावाचे स्वरुप आले आहे. डॉ.बाबासाहेब आंबेडकर चौका पासुन काही अंतरावर महाराष्ट्र ग्रामीण बँक जवळील राज्य महामार्गेवर मोठी भगदाडे पडली असल्याने पावसाचे पाणी या ठिकाणी साचत आहे. जवळपास रस्त्याची पुर्ण रुंदी भाग पाण्याने व्यापला आहे . या रस्त्यावरुन नवीन रहदारी करणारे अनेक वाहनांचा तर या ठिकाणी सतत अपघात होत आहे. खोल पाण्याचा अंदाज येत नसल्याने अनेक दुचाकीस्वार पडत आहेत. रस्त्याच्या दोन्ही दिशेकडून चढ असल्याने आणि या ठिकाणी खोल भाग असल्याने पावसाचे पाणी मोठ्या प्रमाणात साचत आहे. अशीच अवस्था सिरसाळ्यातील मुख्य सिमेंट चौपदरीकरण रस्त्याची झाली आहे.

# बीडच्या विद्यार्थ्याचे लातूरच्या वसतिगृहात हत्याकांड!



- खून केल्याचा आरोप: मृतदेह घेण्यास नातेवाईकांचा नकार
- स्वामी विवेकानंद आश्रम शाळेतील हादरुन टाकणारी घटना
- बीडच्या पालकांनो तुमची मुलं लातूरला असतील तर काळजी घ्या?
- धनंजय मुंडे, पंकजा मुंडे,खा.बजरंग सोनवणेंनी आवाज उठवावा

लातूर /पुण्यभूमी प्रतिनिधी

**शहरातील एमआयडीसी भागात असलेल्या स्वामी विवेकानंद आश्रम शाळेच्या वसतिगृहात इयत्ता सातवीमध्ये शिकणाऱ्या तेरा वर्षीय बालकाचा संशयास्पद मृत्यू झाल्याची घटना मंगळवारी पहाटे निदर्शनास आली असून याबाबत एमआयडीसी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. एका नववीत शिकणाऱ्या मुलीवर लैंगिक अत्याचार करुन जीवे मारल्याची घटना ताजी असतानाच लातुरात पुन्हा ऱ्हदयद्रावक घटना घडली. त्यामुळे राज्य या घटनेने हादरले आहे.दरम्यान वसतिगृहात खून झालेला विद्यार्थी बीडचा असून धनंजय मुंडे, पंकजा मुंडे,खा.बजरंग सोनवणेंनी आपण आवाज उठवून न्याय मिळवून द्यावा अशी मागणी पालकांतून होत आहे.**

बीड जिल्ह्यातील पांगरी (ता. परळी) येथील रहिवाशी असलेला अरविंद खोपे हा विद्यार्थी येथील स्वामी विवेकानंद आश्रम शाळेत शिकण्यासाठी होता, आणि तो राहण्यासाठी शाळेच्या वसतिगृहात होता. शाळेत परीक्षा असल्याने कालच त्याच्या पालकांनी शाळेत आणून सोडले. पालक गावी पोहचताच रात्री अकरा वाजता तुमच्या मुलाच्या पोटाला काहीतरी जखम झाली आहे आणि तुम्ही लवकर या, असा फोन वसतिगृह कर्मचाऱ्यांनी केला. रात्रीच्या वेळी पालकांना शक्य नाही म्हणून अरविंदच्या पालकांनी नातेवाईकास वसतिगृहात पाठवले असता तुमचा मुलगा पळून गेल्याचे कर्मचाऱ्यांनी सांगितले. याचा शोधशोध घेत असताना पहाटेच्या वेळी वसतिगृह कर्मचारी मुलाला घेऊन बाहेर पडत असल्याचे नातेवाईकांनी पाहिले. त्यांनी कर्मचाऱ्यास पकडण्याचा प्रयत्न केला. मात्र तो पळून गेला. त्यामुळे यांचा संशय बळावला असून कर्मचाऱ्यांनीच आमच्या मुलाला मारलं, संबंधितावर कारवाई झाल्याशिवाय आम्ही मृतदेह घेणारं नाही, असा पवित्रा नातेवाईकांनी घेतला. मंगळवारी उशिरापर्यंत मुलाचा मृतदेह वसतिगृह कार्यालयात पडून होता. मृत मुलाचे काका यांच्या फिर्यादीवरून एमआयडीसी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.दरम्यान अरविंदला न्याय मिळाला पाहिजे, लातुर च्या पोलीस अधीक्षकांनी, लातूरचे पालकमंत्री असतील, जिल्हाधिकारी असतील यांनी लवकर भेट घटनास्थळी भेट देऊन अरविंदला न्याय मिळुन देण्याची भूमिका घ्यावी.




### सुनियोजित कट असावा...

अरविंदचा शोधाशोध घेत असताना आश्रम शाळेतील एका बाथरुममध्ये मृत्यूदेह लटकट होता. सुनियोजित कट असुन,अतिशय थंडागर पद्धतीने त्याला मारण्याचा टाकाऱ्याय आलं.त्यानंतर आश्रम शाळेतील शिक्षक गुपचूप अरविंदचा मृत्यूदेह खाली उतरुन जंगलात तो मृत्यूदेह टाकण्यासाठी निघाले असताना, अरविंदच्या नातेवाईकांनी सकाळी त्या शिक्षकांना रांगेहाथ पकडले. लगेच शिक्षकांनी धूम ठोकून तिथून पळ काढला.







### सीसीटीव्ही फुटेज गायब

शिक्षणासाठी वसतिगृहात असलेला अरविंद खोपे हत्याकांड घडल्यानंतर वसतिगृहातील कर्मचारी वर्गाने सीसीटीव्ही फुटेजही गायब केले आहेत. नेमकं त्या ठिकाणी काय घडलं, अरविंदला का मारुन टाकण्यात आलं असे अनेक प्रश्न निर्माण होताहेत. दरम्यान आंबेडकरी संघटनांनी स्वामी विवेकानंद वसतिगृहासमोर ठिय्या मांडून घटनेतील आरोपींचा शोध घ्यावा अशी मागणी लावून धरली होती.

## केज पोलीसांना अरोपी सापडेना का?

### सवाल : गदळेवाडीत येथील घटना

केज/पुण्यभूमी प्रतिनिधी

केज पोलीस स्टेशनच्या हद्दीत असणाऱ्या गदळेवाडीतील एका तरुणीने गावातीलच एका तरुणा सोबत स्वखुशीने प्रेमविवाह केला होता. परंतु सदर मुलीचे वडील पद्माकर बाळानाथ जाधव, बचन बाळानाथ जाधव, निता बबन जाधव, लक्ष्मी भागवत जाधव, भागवत बाळानाथ जाधव, उत्तम लक्ष्मण जाधव यांनी तु आमचे नाक घालवलेस म्हणत सदरच्या मुलीला आणी तिच्या पतिला मारहाण केली तसेच त्या मुलीच्या सासरवाडीतील कुटुंबाला देखील मारहाण करुन मारुन टाकण्याच्या धमक्या देण्यात आल्या होत्या. आपल्या कुटुंबाकडुन प्रेमविवाह केल्यामुळे आम्हाला मारहाण करत मारुन टाकण्याच्या धमक्या देण्यात येत आहे. असे दस्तुरखुद्द या मुलीने तक्रार नोंदवण्यासाठी केज पोलीस स्टेशन गाठले होते, परंतु या मुलीची तक्रार नोंदवून घेण्यास केज पोलीस टाळाटाळ करत होते. परंतु माध्यमांशी संपर्क साधुन या मुलीने आपली कैफियत मांडल्यानंतर केज पोलीस स्टेशनमध्ये दि.१२/३/२०२४ रोजी एफ. आय आर क्रं ०११७ आणी भा.द.बी १४३,१४७,१४८ ३२३, ३२७, ५०४, ५०६ नुसार तक्रार दाखल करून घेण्यात आली होती. पण ती तक्रार नाममात्र लिहून घेतली असल्याचे लक्षात येत आहे. कारण दस्तुरखुद्द त्या मुलीने आपल्या माहेरच्या लोकां विरोधात तक्रार दाखल केल्यानंतर आज तिन महीण्याचा कालावधी उलटुन

पान २ वर...




### केज पोलीसांची भुमिका संशयास्पद

आजही हे आरोपी सदरच्या कुटुंबातील लोकांचा काटा काढु आणी औषधाला सुद्धा माणूस जिवत ठेवनार नाहीत अशा धमक्या देत आहेत. केज पोलीस स्टेशनला सदरील मुलगी आरोपींना अटक का करत नाहीत याबाबत विचारणा करण्यास गेली तर तिला उडवा उडवीची उत्तरे देऊन माघारी पाठवले जातेय. या गंभीर प्रकरणात केज पोलीसांची भुमिका सशयास्पद आहे.

## स्लीप रोडसह उड्डाणपुलाचा प्रश्न मार्गी

### डॉ.योगेश क्षीरसागर : केंद्रीय मंत्र्यांकडून तांत्रिक शक्यता तपासण्याचे निर्देश



बीड/पुण्यभूमी प्रतिनिधी

सोलापूर–छत्रपती संभाजीनगर राष्ट्रीय महामार्गावर बीड शहरालगतच्या स्लीप रोडसह महालक्ष्मी चौकात उड्डाणपुल बांधण्यासंदर्भातील तांत्रिक शक्यता तपासण्याचे निर्देश केंद्रीय भुपृष्ठ वाहतूक मंत्रालयाने दिले आहेत. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे बीड विधानसभा अध्यक्ष डॉ.योगेश क्षीरसागर यांच्या प्रस्तावाचा संदर्भ देत ना.नितीन गडकरी यांच्या आदेशावरून भुपृष्ठ वाहतूक मंत्रालयाच्या तांत्रिक सल्लागारांनी महामार्ग प्राधिकरणाच्या प्रादेशिक अधिकार्यांना हे निर्देश दिले आहेत. त्यामुळे येत्या काही दिवसात हा विषय मार्गी लागण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

सोलापूर–छत्रपती संभाजीनगर राष्ट्रीय महामार्गाच्या बीडच्या वळण रस्त्यावर मोठ्या प्रमाणावर अपघात होतात. येथील महालक्ष्मी चौकात उड्डाणपुल तयार केला तर हे अपघात टाळता येतील असे सांगत डॉ.योगेश क्षीरसागर यांनी भुपृष्ठ वाहतूक मंत्रालयाकडे प्रस्ताव दिला होता. यात महालक्ष्मी चौकातील उड्डाणपुलासोबतच तेलगाव आणि पिंपळनेर रस्त्यावरील स्लिप रोडची देखील मागणी करण्यात आली होती.

पान २ वर...

### ग्रेटभेट...



**परळी:** ओबीसी आरक्षण बचाव यात्रेदरम्यान महापूर जि. लातूर येथे भाजपच्या राष्ट्रीय सचिव आ. पंकजाताई मुंडे व वंचित बहुजन आघाडीचे नेते प्रकाश आंबेडकर यांची भेट झाली. आ. पंकजाताई यांनी या यात्रेला शुभेच्छा दिल्या.

# खोमणेंनी वाळू माफियांच्या गाडीत रवले रुमणे!

### कारवाई : राक्षसभूवन मध्ये तिन कोटींचा मुद्देमाल जप्त

गेवराई/पुण्यभूमी प्रतिनिधी

तालुक्यातील राक्षसभूवन परिसरात गेवराईचे तहसिलदार संदिप खोमणे यांनी छापा मारला असता सात हायवा त्यांनी या कार्यवाईत जप्त केल्या तसेच या कार्यवाहीत अंदाजे तिन कोटींचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून वाळू ही यावेळी जप्त करण्यात आली आहे. ही कारवाई दि ३० मंगळवार रोजी सकाळी सातच्या सुमारास केली आहे.

राक्षसभूवन परिसरात वाळू माफियांनी हौदोस घातला होता तसेच याठिकाणी ही गेल्या पंधरा दिवसांत तिसरी कार्रवाई आहे . गेल्या आठ दिवसापुर्वी राक्षसभूवन च्या २१ वाळू माफिया यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आले होते त्यातच मंगळवार रोजी सकाळी गेवराईचे तहसिलदार संदिप खोमणे यांना गूप्त बातमी दाराने या ठिकाणी वाळू उपसा करूण त्यांची तस्करी हायवा टिप्पर ने सुरु करण्यात येत आहे अशी माहिती मिळाल्यानंतर त्यांनी आपल्या पथका समवेत सदर ठिकाणी छापा मारला तसेच या कारवाईत तिन कोटी रूपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. वाळू देखील जप्त करण्यात आली आहे आतापर्यंत सगळ्यात मोठी ही कारवाई महसूल विभागाकडून करण्यात आली आहे.

एकाच ठिकाणाहून सहा हायवा जप्त केल्याने वाळू माफियात मोठी खळबळ उडाली आहे तसेच या कारवाईत तहसिलदार संदिप खोमणे, नायब तहसिलदार सोनवणे,मंडळअधिकारी बाळासाहेब पखाले,प्रमेश्वर सानप,तलाठी गोविंद ढाकणे,कोतवाल कुंदन काळे सहभागी होते.



## मुस्लिम समाजाला विधनसभेत तरी न्याय द्या

### पडघम: अलीम सय्यद यांचा जयंत पाटलांना सवाल




गेवराई/पुण्यभूमी प्रतिनिधी

पुरोगामी विचारांचा वसा वारसा वाहणाऱ्या महविकास आघाडीला मुस्लिम समाज हा आत्मीयतेने आपला मानत आलाय. त्याचीच साक्ष म्हणून पार पाडलेल्या लोकसभेच्या निवडणुकीत महाराष्ट्रातल्या १२ टक्के असणाऱ्या मुस्लिम समाजाने एकनिष्टेने मतांच्या रूपात भरभरून साथ दिली आहे.. त्याचंच उदाहरण आपल्याला बीडच्या अटीतटीच्या निवडणुकीत जिल्हाभरातील ३ लक्ष मुस्लिम मतदाराने बजरंग बप्पा सोनवणे यांना एकमताने निवडून देऊन एक वेगळा इतिहास रचला आहे.

गेल्या लोकसभेच्या निवडणुकीत महाराष्ट्रातल्या मुस्लिमांनी ज्या प्रकारे साथ दिली आहे त्याच्या मोबदल्यात त्याला न्याय मिळाले का ? तर उत्तर मिळतं नाही.कारण कुठल्याच पक्षाने ४८ जागा मधून एकही जागा मुस्लिम समाजाला दिलेली नाही. त्यात महाविकास

पान २ वर...

# निकालाच्या मर्यादा!

खंडपीठाने ८-१ अशा बहुमताने दिलेला निकाल सर्वार्थाने दूरगामी आहे. यातील मुद्दे केवळ आर्थिक नाहीत. केंद्र-राज्य संबंधांपासून ते कर आकारणीबाबत राज्यांची स्वायत्तता ते पर्यावरण आणि राज्या-राज्यांतील स्पर्धा अशा अनेक मुद्द्यांवर या निर्णयाचा परिणाम होणार असून हा निर्णय जर पूर्वलक्ष्यी प्रभावाने अमलात आला तर आर्थिक आणि राजकीय आघाडीवर हलकल्लोळ माजेल यात शंका नाही. या विषयाची व्याप्ती लक्षात घेता जे झाले ते राज्यघटनेची कलमे आदी तांत्रिक मुद्दे दूर ठेवून समजून घेणे आवश्यक ठरते.सुमारे पाव शतकभर न्यायप्रविष्ट असलेले हे प्रकरण म्हणजे 'मिनरल एरिया डेव्हलपमेंट ऑथॉरिटी विरुद्ध स्टील ऑथॉरिटी ऑफ इंडिया' यांच्यातील खटला. त्यात पुढे झारखंड, प. बंगाल, ओडिशा, उत्तर प्रदेश, मध्य प्रदेश, गोवा, कर्नाटक ही राज्ये आणि प्रत्यक्ष केंद्र सरकार उतरले. यावरून हे प्रकरण सर्वपक्षीय आहे हे लक्षात येईल. ही सर्व राज्ये खनिजसंपन्न आहेत आणि त्या त्या राज्यांकडून स्वामित्वधन 'स्वामित्व मूल्य' (रॉयल्टी) आकारून त्या त्या राज्यांतील खाणींतून खनिजे काढण्याची कंत्राटे सरकारी वा खासगी कंपन्यांना दिली जातात. यापैकी काही राज्यांनी या स्वामित्व मूल्याखेरीज खनिकर्म उद्योगातील कंपन्यांवर कर आकारला. त्यास न्यायालयात आव्हान दिले गेले आणि दोन स्वतंत्र टप्प्यांवर सात आणि पाच सदस्यांच्या खंडपीठाने दोन स्वतंत्र निकाल दिले. यातील एका निकालात ''स्वामित्वधन' म्हणजेच कर' असा निर्वाळा होता; तर दुसऱ्या पीठाने कर आणि स्वामित्वधन हे दोन भिन्न मुद्दे असल्याचे सांगितले. म्हणून अंतिम निवाड्यासाठी सर्वोच्च न्यायालयात यापेक्षा अधिक म्हणजे नऊ न्यायाधीशांच्या पीठासमोर याची सुनावणी झाली. सरन्यायाधीश धनंजय चंद्रचूड, हृषीकेश रॉय, अभय ओक, जेबी पारडीवाला, मनोज मिश्रा, उज्ज्वल भुयान, सतीश चंद्र शर्मा आणि ऑगस्टीन जॉर्ज मसीहा तसेच न्या. बी व्ही नागरत्ना यांच्या पीठाने बहुमताने हे प्रकरण निकालात काढले. स्वामित्वधन आणि कर हे दोन भिन्न मुद्दे आहेत आणि राज्यांना स्वामित्वधनाखेरीज स्वतंत्र कर आकारणी करण्याचा अधिकार आहे यावर आठ न्यायाधीशांचे एकमत झाले आणि न्या. नागरत्ना यांनी स्वतंत्रपणे आठ मुद्द्यांद्वारे आपली मतभिन्नता नोंदवली. त्यांची मते केंद्राच्या मतांशी जुळणारी आहेत. ''जमीन हा विषय जरी राज्यांच्या अखत्यारीत असला तरी त्या जमिनींखालील खनिजे आणि मूलद्रव्यांवर केंद्र सरकारचा हक्क असतो; सबब राज्यांना त्यावर कर आकारण्याचा हक्क नाही'' हा केंद्र आणि न्या. नागरत्ना यांच्या मताचा सारांश. सर्वोच्च न्यायालयाने केंद्राचा हा मुद्दा नाकारला. स्वामित्व मूल्य आणि कर या दोन मुदलात स्वतंत्र बाबी आहेत, स्वामित्वधन म्हणजे कर नाही आणि जमीन हा मुद्दा घटनेनुसार राज्यांच्या अखत्यारीत असल्याने त्या जमिनीतून निघणाऱ्या खनिजावर राज्यांस अधिकार नाही असे म्हणता येणार नाही, असे न्या. चंद्रचूड लिखित बहुमताच्या निकालाचे मर्म. पेट्रोलजन्य घटक वगळता कोळसा, लोह, लोहखनिज, तांबे, बॉक्साइट आदी खनिजांस हा निकाल लागू होतो.या निकालामुळे वर उल्लेखलेल्या राज्यांस आपापल्या राज्यातील खनिजावर कर आकारण्याचा हक्क मिळेल आणि ही राज्ये संपत्ती निर्मितीत अन्य राज्यांशी स्पर्धा करू शकतील. तथापि न्या. नागरत्ना आणि केंद्र सरकारचे म्हणणे असे की यामुळे या राज्यांना इतरांच्या तुलनेत असमान आघाडी मिळेल तसेच केंद्रीय अधिकारांवर गदा येऊन राज्ये वाटेल तशी मनमानी करून खाण कंपन्यांवर अन्यायकारक कर आकारणी करतील. ''आमची जमीन, आमचा अधिकार'' हे याउलट राज्यांचे म्हणणे. ते सर्वोच्च न्यायालयाने ग्राह्य धरले. राज्ये ही कोणी भांडणारी बालके आहेत आणि त्यांना नियंत्रणात ठेवणे ही पालक या नात्याने आमची जबाबदारी आहे, असा काहीसा सूर या प्रकरणी केंद्राचा दिसतो. वरवर पाहिल्यास त्यात गैर काय, असे कोणास वाटेल. पण केंद्र सरकार प्रसंगी निष्पक्ष नसते आणि राज्यांच्या अधिकारांवर गदा आणण्यास कमी करत नाही. केंद्रासाठी 'महत्त्वाच्या' असणाऱ्या खाण उद्योगांस राज्यांची इच्छा डावलून कसे मुक्तद्वार दिले जाते याची उदाहरणे कमी नाहीत. काही विशिष्ट उद्योगांस सर्व नियम धाब्यावर बसवून हव्या तितक्या खोदकामाचे परवाने मुक्तपणे कसे दिले जातात, हेही नवे नाही. तेव्हा केंद्राचा या प्रकरणातील युक्तिवाद प्रामाणिक मानणे अवघड.त्याचे एक उत्तर वस्तू-सेवा कर(जीएसटी) यांत आहे. या केंद्र-चलित कराने राज्य सरकारांचे उत्पन्नाचे जवळपास अधिकार काढून घेतले असून त्यामुळे राज्यांच्या अर्थमंत्र्यांस नोंदी कारकुनाच्या पातळीवर आणून ठेवले आहे. मालमत्ता करादी एखाद-दोन क्षुल्लक घटक वगळता राज्य सरकार अन्य कोणत्याही मार्गाने आपले उत्पन्न वाढवू शकत नाही आणि त्यांस केंद्राकडून मिळणाऱ्या कर महसुलातील मिळणाऱ्या वाट्याकडे डोळे लावून बसावे लागते. वस्तू-सेवा कर-पूर्व काळात राज्याराज्यांत तीव्र स्पर्धा होती. विक्री कर कमीअधिक करण्याच्या अधिकाराद्वारे त्यांना आपल्या प्रगतीचा वेग वाढवता येत असे. वस्तू-सेवा कराने राज्यांचा हा अधिकार काढून घेतला. पण आपला हा वस्तू- सेवा कर प्रामाणिक आणि धड नाही. तो जन्मतःच अपंग आहे. कारण पेट्रोल-डिझेल आणि मद्या हे घटक वस्तू-सेवा कराच्या बाहेर ठेवण्यात आले असून त्यांवर कर आकारणीचे अधिकार राज्यांस आहेत. याचा अर्थ असा की आपले सगळेच अर्धवट. वस्तू-सेवा करही प्रामाणिक नाही आणि राज्यांचे अधिकार बजावणेही अप्रामाणिक. म्हणून हा संघर्ष दोन अप्रामाणिकांतील वाद ठरतो. त्यात तूर्त राज्यांची सरशी झालेली असली तरी त्यातून काही प्रश्न नव्याने समोर येतील, हे निश्चित. येत्या बुधवारी सर्वोच्च न्यायालयातर्फे या नव्या निर्णयाची अंमलबजावणी पूर्वलक्ष्यी असावी का, कधीपासून याबाबतचे अंतिम चित्र स्पष्ट होईल. ते झाले तरी आपले राजकारण आणि अर्थकारण जोपर्यंत प्रामाणिक, पारदर्शी आणि पक्ष-निरपेक्ष होत नाही तोपर्यंत या अशा प्रश्नांचा निकाल न्यायालयीन निवाड्यात लागणार नाही.

# हरहुन्नरी कलावंताची बहुआयामी पत्रकारिता म्हणजे सुशिल टकले



ते उत्कृष्ट सुत्रसंचालन करतात. अनेक कला जोपासून ते कार्यरत आहेत. तबला-पेटी,शेती, शाळा आणि सांस्कृतिक रंगमंच त्यांच्या आवडीचे विषय आहेत. एकदा का तबल्यावर थाप पडली की, ते त्या नादमय वातावरणात रमून जातात. भान हरपून कलेची कदर करणारा हा हरहुन्नरी पत्रकार आहे. पत्रकारितेत आल्यापासून त्यांचा परिचय वाढत गेलाय. मनाने निरभ्र असलेले सुशील विश्वंभर टकले मु.पो. पांढरवाडी ता. गेवराई जि.बीड यांचा ३० जुलै रोजी वाढदिवस आहे. एका नवोदित पत्रकाराचा वाढदिवस साजरा होत असताना, टकले सरांना सकारात्मक पत्रकारितेसाठी शब्द पुष्पाच्या आभाळभर शुभेच्छा..!

सुशिल टकले, गेल्या सात आठ वर्षांपासून पत्रकारितेत काम करताहेत. इलेक्ट्रॉनिक, प्रिंट माध्यमांत चांगले रमलेत. गुड कॉन्टॅक त्यांच्या यशस्वी होत असलेल्या पत्रकारितेचे गमक म्हणावे लागेल. त्यांच्या मालकीचे गेवराई न्यूज नावाचे यूट्यूब चॅनल समाजातल्या तळागळात पोहचले आहे. चांगल्या टप्प्यावर चॅनल असताना, अज्ञात भामट्याने त्यांचे चॅनल हॅक केले. त्यामुळे,त्यांना मानसिक त्रास सहन करावा लागला. एवढे होऊन ही, त्यांच्या चेहर्यावरचे हास्य कमी झाले नाही. पून्हा नव्याने भरारी घेऊ आणि उभे राहू, ही भावनाच त्यांच्यातला लोकशाही बळकट करणारा माणूस ठळकपणे दिसतो. सतत धडपड करायची, हसत खेळत पत्रकारितेत काम करणारा नवोदित पत्रकार म्हणून, सुशील सरांनी स्वकर्तृत्वावर नाव केले आहे.

गेवराई बीड शहरापासून अगदी हाकेच्या अंतरावर असलेल्या पांढरवाडी सारख्या ग्रामीण भागातून शहरात येऊन त्यांनी पत्रकारितेला सुरूवात केली. फळाची अपेक्षा न ठेवता बातमीला आकार देऊन, समाजातल्या गोरगरीब घटकासाठी सदैव तत्पर राहून, आपली नैतिक जबाबदारी पार पाडत आलेत.

त्यांचे वडील विश्वंभर टकले ज्येष्ठ नाट्यकर्मी आहेत. खिशाला कात्री लावून, नाट्य संमेलनात भाग घेतला. नाटके बसवली, सादर केली. त्यांनी पगारातले पैसे नाटकासाठी लावलेत. अगदी वामन मुर्ती. नाटकात काम करताना, तरूणांना नाटकाची आवड निर्माण होईल, या दृष्टिकोनातून त्यांनी त्या काळात प्रयत्न केलेत. आम्ही त्यांना ओळखायचो. मात्र, सुशिल सरांचे ते वडील आहेत. हे जेव्हा कळले तेव्हा टकले यांच्या विषयीचा आदर आणखीन वाढला. आपण म्हणतो कलेला मरण नसते. मात्र, कलेच्या वेडापाई कलाकारांना निखाऱ्यांवर चालावे लागते. याचा अनुभव टकले सरांना, आदर्श वडलाच्या माध्यमातून पाहता आला.

सुशिल यांनी मात्र बातमीला जवळ केले. बातमी जिवंत करण्याची कला, त्यातला नेमका संदर्भ देऊन, बातमी मागची बातमी शोधून काढण्याचे कसब टकले यांनी स्वतःच तयार केलय. तेच त्यांच्या बातमीचे गुरू आहेत. असे जर म्हटले तर ते अधिक सोयीचे ठरेल. कोरोना सारख्या महामारीत टकले यांनी रस्त्यावर उभे राहून काम केले. पॉझिटिव च्या भितीने भांबावलेल्या लोकांना पॉझिटिव एनर्जी देणारा हा



**सुभाष सुतार**
पत्रकार बीड

युवा पत्रकार, मी स्वतः पाहिला आहे. त्यांचा अलीकडच्या काळात संपर्क आला. ते पत्रकार आहेत. एवढी माहिती नक्की होती. केंब्रिज सारख्या नामवंत शाळेत ते कलेचे शिक्षक म्हणून कार्यरत होते. त्या व्यासपीठावर त्यांचा संपर्क आला. संवाद झाला आणि वाढला. काही काळानंतर त्यांनी पत्रकारितेत स्वतःला झोकून देऊन काम करायचा निर्णय घेतला. रागलोभ नाही. त्या भानगडीत ते पडत नाहीत. हसून विषय टाळायचा आणि पुढे जायचे, उगीचच विवादात पडत नाहीत. बातमीचा पिच्छा सोडत नाहीत. हे त्यांच्या स्वभावातले वैशिष्ट्य आहे. पंचायत समिती, सरकारी रुग्णालय, तहसील कार्यालय, इ. सरकारी, निमसरकारी कार्यालयाच्या संदर्भाने

अनेक बातम्यांची दखल प्रशासनाला घ्यायला लावणारे सुशिल टकले, नावा प्रमाणे पत्रकारितेत सुशिल राहीलेत. हा जयद्रथ, हा सूर्य, या धाटणीतला त्यांचा स्वभाव आणि त्याच प्रवाहातली त्यांची बातमीदारी, वाचकांना अंतर्मुख करायला लावते. ते पुराव्या शिवाय बोलत नाहीत. त्यांचे सर्व व्यापी कॉन्टॅक त्यांच्या बातमीचे खरे स्त्रोत आहेत. शब्दांच्या श्रीमंतीत रमणारा पत्रकार आहे. कवी दुष्यंत म्हणायचे, हंगामा खडा करना मेरा मकसद नही. मेरी कोशिश होगी, ऐ तस्बिर बदलनी चाहिए..! या अर्थाने, समाजाला जीवनसत्व द्यायची जबाबदार पत्रकारांची आहे. मुक्यांचा आवाज होता आले पाहिजे. कोणतीही अपेक्षा न ठेवता, हे मूल्य सांभाळून पत्रकारितेत शाश्वत सत्य शोधण्याची गरज आहे. सुशिल टकले यांच्या सारख्या असंख्य तरूण, नवोदित पत्रकारांना हे शिवधनुष्य हाती घ्यावे लागेल. टकले सरांना वाढदिवसानिमित्त आरोग्यमय आभाळभर शुभेच्छा..!

# अनियंत्रित विकासामुळे 'महापूर'



नागपूरसह विदर्भ अलीकडच्या काही वर्षांत शहरी भागात उद्भवणाऱ्या पूरस्थितीसाठीही ओळखला जाऊ लागला आहे. यासाठी कारणीभूत ठरली आहे ती नियोजन धाब्यावर बसवून केलेली विकासकामे. विदर्भातून जाणाऱ्या नागपूर-मुंबई समृद्धी महामार्गावर पाण्याच्या निचऱ्याचे नियोजन नसल्याने ते शेतात शिरते, सिमेंट रस्त्यालगत नाला नसल्याने नागपुरात दरवर्षी हजारो घरात पाणी जाते, चंद्रपूर जिल्ह्यात कोळसा खाणींतून निघालेल्या मातीच्या ढिगाऱ्यांना अडून नदीचे पाणी गावांना पुराचा फटका बसतो. कमी-अधिक प्रमाणात अशी स्थिती विदर्भातील छोट्या शहरांमध्येही आहे.गरज नसताना बांधले जात असलेले सिमेंट रस्ते, नदी असूनही नाल्याचे स्वरूप आलेल्या नागनदीच्या पात्रात सर्व नियम धाब्यावर बसवून करण्यात आलेली बांधकामे यामुळे नागपूर शहराला दरवर्षी पुराचा फटका बसतो. यंदा २० जुलैला झालेल्या तीन तासांच्या पावसात नागपूरच्या सर्व प्रमुख वस्त्यांमधील सुमारे दहा हजार घरांमध्ये पाणी शिरल्याचे खुद्द महापालिका आयुक्त डॉ. अभिजीत चौधरी यांनी जाहीर केले. त्यापूर्वी २३ सप्टेंबर २०२३ मध्ये झालेल्या पावसात तर तब्बल एक हजार कोटींची हानी झाली होती आणि ४० हजारांवर घरात पाणी शिरले होते. पावसाळ्यात पाऊस येणारच मग दरवर्षी परिस्थिती का यावी, याचे उत्तर विकासकामांच्या अतिरेकात सापडते. प्रत्येक रस्ता सिमेंटचाच करण्याचा आग्रह, तो करताना त्यावर साचलेल्या पाण्याच्या निचऱ्याची न केलेली व्यवस्था, त्यामुळे तासभर पाऊस झाला तरी रस्त्यावर पाणी साचते आणि पाण्याचा प्रवाह अधिक असेल तर लोकांच्या घरात दोन-दोन फूट पाणी जाते. अंबाझरी लेआऊट परिसरात नागपूर सुधार प्रन्यास या सरकारी यंत्रणेनेच नदी व्यापाऱ्याला भाडेपट्ट्यावर दिली व त्याने थेट नदीवरच अतिक्रमण करून तिचे पात्र अवरुद्ध केले. परिणामी नदीला पूर आला की मग मिळेल त्या जागेतून मार्ग काढत पाणी परिसरातील शेकडो घरांमध्ये शिरते. याच भागात नदीवर स्लॅब टाकून ती जागा वाहनतळासाठी वापरली गेली आहे. नागपूच्या अंबाझरी तलावाला खेटून सौंदर्यीकरणाच्या नावाखाली पुतळा उभारण्यात आला आहे. आजूबाजूला बांधकाम करण्यात आले आहे. तलाव ओव्हरफ्लो झाला की तेथील पाणी या बांधकामाला अडून रस्त्यावर येते. हे सर्व बेकायदेशीर आहे हे सरकारी यंत्रणा मान्य करते, पण ती पुतळा हटवायला तयार नाही. असाच प्रकार फुटाळा तलावाच्या बाबतीतही घडला आहे.

तलावाच्या मध्यभागीच रंगीत कारंजी उभारण्यासाठी बांधकाम करण्यात आले आहे. शहरात मागील दहा वर्षांत अनेक उड्डाण पुलाचे काम हाती घेण्यात आले. या कामांमुळे रस्त्यालगतचे नाले बुजले. त्यामुळे पावसाचे पाणीच जायला मार्ग उरला नाही. नागपुरात महापालिका, नागपूर सुधार प्रन्यास, राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण, महामेट्रो यांची एकाच वेळी बांधकामे सुरू आहेत. यांच्यात कुठलाही समन्वय नाही, बांधकाम साहित्य घेऊन येणाऱ्या जड वाहनांने रस्त्यांची चाळणी झाली, आता रस्ता शोधत नागपूरकरांना जावे लागते, इतकी वाईट स्थिती निर्माण झाली आहे. विकासाला विरोध असण्याचे काहीच कारण नाही, पण तो जिवावर उठायला नको. नागपूरमध्ये नेमके हेच झाल्याने संताप वाढला आहे.चंद्रपूर जिल्ह्यात वेस्टर्न कोलफिल्ड लि.च्या सुमारे ४० कोळसा खाणी आहेत. त्यापैकी काही नदीजवळ आहेत. खाणीतून काढलेली माती नजीकच्या खुल्या जागेवर टाकली जाते. त्याचे आता ठिकठिकाणी डोंगर उभे झाले आहेत. नदीला पूर आला की पाणी या ढिगाऱ्यांना अडून गावात शिरते. राजुरा तालुक्यातील राजुरा शहर, सास्ती, पवनी, गोवरी, चिंचोली, कोलगाव, वरोरा तालुक्यातील माजरी व अन्य गावांत ही समस्या आहे. याच कारणामुळे वर्धा नदीचे पाणी गावांमध्ये शिरते. कोळशाचे उत्खनन करता यावे म्हणून इरई नदीचा प्रवाह वळवण्यात आला आहे. या भागातील पूरसमस्येचे हेच प्रमुख कारण असल्याचे गावकरी सांगतात.




# लाडकी बहीण योजनेची नोंदणी

बीड/पुण्यभूमी प्रतिनिधी

प्रभाग क्र.२४ मध्ये नगरसेवक रणजित बनसोडे यांनी आपल्या कार्यालयात गरजु महिलांसाठी मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनांची नोंदणी रविवार दि.२८ जुलै रोजी डॉ.योगेश क्षीरसागर यांच्या मार्गदर्शनाखाली ज्येष्ठ नागरिक यांच्या उपस्थितीमध्ये करुन घेतली.

रविवारी झालेल्या या नोंदणी उपक्रमामध्ये १०० पेक्षा जास्त महिला भगिनींनी उपस्थिती नोंदविली. तसेच बाजीराव चव्हाण, यांनी भ्रमणध्वनीवरुन संपर्क करुन या उपक्रमाचे कौतुक केले व योगेश भैय्यानी देखिल शुभेच्छा दिल्या, प्रभागातील नगरसेवक भैय्यासाहेब मोरे यांनी या उपक्रमाला उपस्थिती लावली.तसेच प्रभागातील राहिलेल्या गरजू महिलानी सपर्क कार्यालयावर कागदपत्र जमा करण्याचे आव्हान नगरसेवक रंजीत बनसोडे यांनी केले.

# मुख्यमंत्र्यांच्या नावाने असलेल्या अभियानातील बक्षिसे मिळेनात!

## चर्चेतले : माजी खा. तनपुरेंनी उपस्थित केला प्रश्न

राहुरी/पुण्यभूमी प्रतिनिधी मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा या अभियानातील शाळांची घोषणा होऊनही तालुका स्तरीय विजेता शाळांची घोषणा होऊनही बक्षीस मिळाले नसल्याने ही बक्षिसे का देण्यात आली नाही असा प्रश्न माजी खासदार प्रसाद तनपुरे यांनी उपस्थित केला आहे.२०२३-२४ या शेक्षणिक वर्षां मध्ये भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर आदर्श शाळा योजने अंतर्गत मुख्यमंत्री माझी शाळा शाळा हे अभियान १जानेवारी ते १५ फेब्रुवारी या कालावधीत राबविण्यात आले या स्पर्धेतील विजेत्या शाळांची घोषणा जिल्हास्तरावरुन जाहीर करण्यात आली ४ते५महिने होऊनही बक्षिसे मिळत नसल्याने शिक्षक व विद्यार्थी मध्ये मोठ्या प्रमाणात नाराजी पसरली आहे.पहिले बक्षीस तीन लाख रुपये कुषी विद्यापीठातील सावित्रीबाई फुले तर दुसरे व तिसरे डॉ बाबुराव बापुजी तनपुरे शिक्षण संस्थेच्या शाळा ना अनुक्रमे दोन लाख व एक लाख रुपये पारितोषिक देऊन गौरविण्यात येणार आहे मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा हे अभियान मुख्यमंत्र्यांच्या नावाने आहे तरी अभियानातील बक्षिसे मिळत नसल्याने आश्चर्य व्यक्त होत आहे

## टि.सी हरवला आहे

ढेंगे कृष्णा मारुती यांचा इयत्ता डीएडचा टि.सी. बसमध्ये प्रवास करताना हारवला आहे. सापडल्यास संपर्क करा.

मोबाईल नंबर

९६५७१०२७०८

## पान एक वरून

**केज पोलीसांना अरोपी...**

गेला आहे. परंतु केज पोलीसांनी बातील एकाही आरोपीला अटक केली नाही, याउलट हे सगळे आरोपी उजळ माथ्याने गावात राजरोसपणे फिरत असुन आजही त्यांच्या कडुन मुलीच्या सासरच्या लोकांच्या जिवीतास धोका आहे. कारण आजही हे आरोपी सदरच्या कुटुंबातील लोकांबा काटा काढु आणी औषधाला सुद्धा माणूस जिवंत ठेवनार नाहीत अशा धमक्या देत आहेत. केज पोलीस स्टेशनला सदरील मुलगी आरोपींना अटक का करत नाहीत याबाबत विचारणा करण्यास गेली तर तिला उडवा उडवीची उत्तरे देऊन माघारी जातेय. या गंभीर प्रकरणात केज पोलीसांची भूमिका सशंयास्पद आहे. कारण गुन्हा घडताच पिडीत मुलगी केस दाखल करण्यासाठी आली असता तिची केस दाखल करण्यास टाळाटाळ करण्यात आली होती. नंतर प्रसारमाध्यमात प्रकरण गेल्यानंतर नावालाच त्या मुलीची केस दाखल करून घेतली होती. आणी आज तीन महीण्याचा कालावधी होऊन सुध्दा केज पोलीसांना यातील एकही आरोपी सापडत नाही म्हणजे ? है आश्चर्य म्हणावे लागेल.

पोलीसांना दांडगी रक्कम मिळाली का ?

आणी त्यामुळेच केज पोलीस रितसर गुन्हा नोंद होऊनही कारवाई करण्यास टाळाटाळ करत आहेत अशी चर्चा केज पोलीसांच्या भुमिकेमुळे सुरू आहे. मुळात कुठल्याही सज्ञान असणा-या मुलाला किंवा मुलीला कायद्याने आपल्या ईच्छेप्रमाणे प्रेमविवाह करण्याचा अधिकार आहे, भलेही मग ते दोघे विविध जात. पंथ. वा धर्माचे असो. अशा विवाहित जोडप्याला कायद्याने संरक्षण देण्याचे काम पोलीस खात्याचे आहे.

**स्लीप रोडसह उड्डाणपुलाचा...**

या पत्रांचा संदर्भ देत आता भुपृष्ठ वाहतूक मंत्रालयाचे तांत्रिक सल्लागार बाळासाहेब ठेंग यांनी राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाच्या नागपूर येथील प्रादेशिक अधिकार्यांना पत्र लिहिले आहे. यात उड्डाणपुल आणि स्लिप रोड संदर्भातील तांत्रिक शक्यता तपासून अहवाल सादर करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. दरम्यान, हा प्रश्न राष्ट्रवादी काँग्रेसचे बीड विधानसभा अध्यक्ष डॉ.योगेश क्षीरसागर यांनी सतत लावून धरला. अलीकडे लोकसभा निवडणूक प्रचारादरम्यान माजलगाव येथे जाहीर सभेत हा प्रश्न मार्गी लावण्याची घोषणा ना.नितीन गडकरी यांनी केली होती. त्यानुसार विभागाकडून पाऊले उचलली जात आहेत.

शिफारशीमुळे आले यश

परळी येथे शासन आपल्या दारी कार्यक्रमात आलेले उपमुख्यमंत्री ना.अजितदादा पवार, पालकमंत्री ना.धनंजय मुंडे यांच्याकडे बीड शहराजवळील उड्डाणपुलांसह स्लिप रोडचा प्रश्न मार्गी लावण्याची मागणी डॉ.योगेश क्षीरसागर यांनी केली होती. त्या मागणीच्या अनुषंगाने दोघांनीही रस्ते, वाहतूक व दळणवळण विभागाकडे शिफारस केली होती. तसेच, आ.पंकजाताई मुंडे यांनी हा प्रलंबित प्रश्न ना.नितीन गडकरींच्या कानावर घातला. उड्डाणपूल, स्लिप रोडसाठी डॉ.योगेश क्षीरसागर यांचा सातत्याने पाठपुरावा सुरू होता. त्यांच्या पाठपुराव्याला यश मिळत आहे.

**मुस्लिम समाजाला विधनसभेत ...**

आघाडी सुद्धा आहे हे नवीन नको सांगायला..

मौलाना आझाद याचं एक वाक्य आहे की , कुठलाही समाज सुधारत नाही जो पर्यंत त्याचा राजकीय अन् सामाजिक सहभाग होत नाही. मुस्लिम समाजाचं मागासलेपण दूर करण्यासाठी महाविकास आघाडीने मुस्लिम समाजाला उभ्या महाराष्ट्रातून तर न्याय द्यावाच परंतु बीडच्या दृष्टीने विधानसभेसाठी मुस्लिम चेहरा देण्यात यावा ही विनंती गेवराईचे निष्ठावंत कार्यकर्ते अलीम सय्यद यांनी राष्ट्रवादी चे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांच्याकडे केली.

संपादक : **बाळासाहेब भगवान मस्के**, कार्यकारी संपादक : **सुनिल मसू डोंगरे**
हे दैनिक प्रकाशक,मुद्रक,मालक,संपादक बाळासाहेब भगवान मस्के यांनी बी.एम.प्रिंटर्स ॲन्ड पब्लिकेशन, बीड, ता.जि.बीड येथे छापून दैनिक बीड पुण्यभूमी तहसीलच्यामागे, डीपी रोड बीड (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.
(अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.) न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत दुरध्वनी-०२४४२-२९९०८४,ई-मेल-beedpunyabhumi@gmail.com
Daily Beed punyabhumi hews paper owner, publisher, Edit Balasaheb Bhagwan Maske has printed at B.M. printexs, behing the tehsil, dp road (Maharashtra) 431122
Published at daily Beed Punyabhumi office, behing the tehsil, dp road, beed -431122 Phone No. (02442)299084, Email-beedpunyabhumi@gmail.com

# शास्त्रीय माहिती असणे अत्यावश्यक!

## डॉ. सविता शेटे यशवंत विद्यालयात व्याख्यान

बीड/पुण्यभूमी प्रतिनिधी

येथील यशवंत विद्यालयातील किशोरींसमोर वयात येताना या विषयावर व्याख्यान देत असताना प्राचार्य डॉ.सविता शेटे ,राज्य कार्यवाह, विवेकवाहिनी, महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती यांनी प्रत्येक किशोरवयीन मुलीस वयात येताना बाबतची शास्त्रीय माहिती असणे अत्यावश्यक आहे असे प्रतिपादन केले.

र.धो. कर्वे यांनी लैंगिक शिक्षणावर केलेले काम, त्यांनी १५ जुलै १९२७ रोजी सुरू केलेले समाजस्वास्थ्य मासिक या निमित्ताने महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या वतीने राज्यभर जुलै महिन्यात लैंगिकता प्रबोधन कार्यक्रम आयोजित केले आहेत. याच अनुषंगाने महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती शाखा बीड च्या वतीने आयोजित वयात येताना या विषयावर प्राचार्य डॉ सविता शेटे यांनी यशवंत विद्यालय बीड येथे किशोरवयीन मुलींसमोर व्याख्यान दिले.



या प्रसंगी त्यांनी या बाबतची संपूर्ण शास्त्रीय माहिती दिली.वयात येणे म्हणजे नेमकी काय प्रक्रिया होते ? शरीरात स्त्रवणारे स्त्राव, त्यामुळे मुलींच्या शरीरात होणारे शारीरिक बदल ,भावनिक बदल, त्यामागील शास्त्रीय कारणे, मासिक पाळी ,त्याची प्रक्रिया, त्यामागील विज्ञान, मासिक पाळी विषयीचे अज्ञान, गैरसमज, अंधश्रद्धा ,गर्भधारणा यावर सविस्तर माहिती दिली. तसेच या काळात किशोरीनी घ्यायची काळजी ,समतोल आणि पौष्टिक आहार,विश्रांती ,व्यायाम, स्वच्छ्ता,याची सखोल माहिती देवून मासिक पाळीचे व्यवस्थापन कसे करावे यावर मांडणी केली.

मासिक पाळी कोणत्याही दृष्टीने अपवित्र नसून ती पूर्णतः नैसर्गिक प्रक्रिया आहे आणि अपत्य प्राप्तीसाठी असणारी पूर्वअट आहे.हे प्रत्येक मुलीस आणि महिलेस माहित असणे खूप आवश्यक आहे.

अन्यथा चुकीच्या किंवा अशास्त्रीय माहिती मधून अनेक गैरसमज आणि अंधश्रद्धा वाढीला लागतात. वाईट घटना घडतात.याचा परिणाम मुलींच्या एकूण वाढ आणि विकासाच्या प्रक्रियेवर होतो. मुलींचे हे वय फुलण्याचे असते. त्यामुळे किशोरींसह शिक्षक आणि पालकांनीही खबरदारी घेणे गरजेचे आहे. या व्याख्यानाच्या वेळी मुलींनी अनेक प्रश्न विचारले ,यापूर्वी आम्हाला याची माहिती नव्हती, अजून माहिती द्यावी अशी मुलींची मागणी होती.

यावरून या विषयाचे गांभीर्य लक्षात घेणे आवश्यक आहे,असे डॉ सविता शेटे यांनी सांगितले.याप्रसंगी यशवंत विद्यालयाचे मुख्याध्यापक श्री गणेश वाघ उपस्थित होते. शाळेतील विद्यार्थिनी आणि शिक्षिका यांनी या कार्यक्रमास उस्फुर्त प्रतिसाद दिला.

# लिंबोडी तलावात पाणीच पाणी

## दिलासा: कडेकरांचा पाणी प्रश्न सुटला



कडा/पुण्यभूमी प्रतिनिधी

परतीच्या पावसाच्या दमदार हजेरीमुळे कड्यासह अनेक गावांची तहान अवलंबून असणारा लिंबोडी तलावात जवळपास एकाच आठवड्यात ऐंशी टक्के पाणीसाठा उपलब्ध झाला आहे. या तलावाच्या संरक्षण भिंतीवरुन पाणी पडण्यासाठी अवघा दोन फुट इतकाच बाकी असल्याने नागरीकांतून समाधान व्यक्त करण्यात येत आहे.

आष्टी तालुक्यातील लिंबोडीचा तलाव हा कड्यासह परिसरातील जवळपास दहा ते बारा गावांची तहान भागवणारा एक मोठा प्रकल्प आहे. मागील दोन महिण्यापूर्वी या तलावात केवळ पंचवीस ते तीस टक्के पाणीसाठा शिल्लक होता. मागील आठवड्यात परतीच्या दमदार पावसाने आष्टी तालुक्यात सर्वदूर हजेरी लावली. आठ दिवस तर अक्षरश: सुर्यदर्शन दुर्लभ झाले होते. सध्या तलावात जवळपास ऐंशी टक्के पाणीसाठा उपलब्ध झाल्याचे चित्र पाहायला मिळते. या लिंबोडी तलावाच्या संरक्षण भिंतीवरुन पाणी पडायला केवळ दोन फुट इतकाच बाकी राहिला. त्यामुळे कड्यासह परिसरातील अनेक गावांचा पाणी प्रश्न मार्गी लागला म्हणावा लागेल. त्यामुळे नागरीकांतून समाधान व्यक्त करण्यात येत आहे

# स्मारकाच्या मोकळ्या जागेत बौद्धी वृक्षाचे रोपण

## हणुमंत कांबळे : येरगी येथे पार पडला कार्यक्रम

देगलूर/पुण्यभूमी प्रतिनिधी

भारतरत्न डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या स्मारकासाठी नियोजित असलेल्या मौजे येरगी ता. देगलूर जि.नांदेड येथील मोकळ्या जागेत दि.२८जुलै,२०२४ रोजी बहुसंख्य धम्म बांधवांच्या उपस्थित पुज्य भंत्ते बौद्धीरत्न थेरो यांच्या हस्ते बौद्धी वृक्षाचे रोपण करण्यात आले. यावेळी पुज्य भंत्ते बौद्धीरत्न थेरो यांनी वृक्षारोपणाचे महत्त्व पटवून देताना जगाला शांतीचा,समतेचा,मानवतेचा आणि बंधुभावाचा मार्ग दाखवणारे तथागत गौतम बुद्धांना जन्म आणि बौद्धीसत्वाचे ज्ञान हे वृक्षाखालीच प्राप्त झालेले आहे. वृक्ष निरंतर सावली, फुले,फळे आणि प्राणवायू देतात असे सांगितले.त्यावेळी बहुसंख्य धम्म बांधव उपस्थित होते. यामध्ये आयु. रमेश परमेश्वर देवगीरे, सुरेश यादवराव देवगीरे,अक्षयकुमार देवगीरे, शंकरराव भिमराव वाघमारे,राहुल सुदाम वाघमारे,जळबाजी मष्णाजी वाघमारे, सोपानराव बोडके गुरूजी,शांताबाई तुकाराम सुंदाळे,शांताबाई वाघमारे, नागमनी सुर्यवंशी, इंजिनियर आकांक्षा देवगीरे, इंजिनियर चिऊताई सुदाम देवगीरे, जिज्ञासा सोपानराव बोडके, संस्कृती संजय देवगीरे, अनिता सोपानराव बोडके आणि भारतीय बौद्ध महासभा शाखा बीड चे कोषाध्यक्ष अमरसिंगजी ढाका, एडव्होकेट हणमंतराव परमेश्वर कांबळे, प्राध्यापक डॉक्टर पांडुरंगराव सुतार, प्राध्यापक अशोकराव कांबळे, डी.एम.राऊत सर, डी. जे. वानखेडे सर,प्रशांतजी वासनिक, सिद्धार्थ सुर्यवंशी इत्यांदी उपस्थित होते. त्यांनी भारतरत्न डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या स्मारकासाठी नियोजित असलेल्या या मोकळ्या जागेत सुशोभित स्मारक लवकर उभे राहील यासाठी सहकार्य व सहयोग देण्याचा संकल्प केला आहे.



# रस्त्यावरील काटेरी झाडेझुडपे हटवली

## दिलासा : सरपंच हनुमान घोडकेंची स्तुत्य कामगिरी

सिरसाळा/पुण्यभूमी प्रतिनिधी

माजलगाव तालुक्यातील कोथरुळ व परळी तालुक्यातील हिवरा ह्या गावाला जोडणारा ५ किमीचा रस्ता काटेरी झाडे – झुडपांच्या विळख्यात सापडला आहे. या मुळे रहादारी करण्यास खुप अडचण निर्माण होत आहे. संबंधित सार्वजनिक बांधकाम विभाग तर लक्ष देत नाही व प्रश्न तर रहदारी च्या दृष्टीने गंभीर आहे हे लक्षात घेता हिवरा गावचे सरपंच हनुमान घोडके हे उपसरपंच/ ग्रामपंचायत सदस्य यांच्या सहकार्याने स्वता लक्ष घालून स्व खर्चाने जेसीबी यंत्रा द्वारे रस्त्या लगतची काटेरी झाडे – झुडपे हटवण्याचे कार्य करत आहेत. गेल्या दोन दिवसांपासून सरपंच घोडके हि मोहीम राबवत आहेत. पावसाळा असल्याने रस्त्या लगत मोठ्या प्रमाणात काटेरी झाडे वाढली आहेत, वाढलेली झाडांच्या फांद्या रस्त्यावर लोबंत आहेत किंवा पसरत आहेत परिणामी वाहन धारकांनी आपली वाहने मोठ्या कसरतीने चालवावी लागत आहेत. वाहन समोरासमोर आले तरी पास व्हायला खुप अडचण निर्माण होत आहे. विशेषत माजलगाव डेपोची बस गाडीला ह्या मार्गावरुन परळी कडे ये–जा करण्यास अडथळा होत आहे. ह्या कारणाने बस बंद झाली तर ह्या भागातील विद्यार्थी व नागरिकांना शहराच्या ठिकाणी जाण्यात खुप अडचण निर्माण होणारी आहे. तसेच वळणाच्या ठिकाणी पुढील रस्ता दिसत नाही त्या मुळे अपघाताचा धोका देखील वाढला होता. सदरील बाब गंभीर आहे हे लक्षात घेता सरपंच हनुमान घोडके यांनी यांनी स्वता लक्ष घालून उपसरपंच/ग्रामपंचायत सदस्य यांच्या सहकार्यातून रस्त्यावर काटेरी झाडे झुडपे हटवण्याचे कार्य केले जात आहे.



# शाहू महाराजांच्या डॉक्युड्रामाला आवाज

## सांस्कृतिक :डॉ.सतीश साळुंके यांचा व्हाईस ओव्हर

बीड/पुण्यभूमी प्रतिनिधी

कोल्हापुर येथे राजर्षी शाहू महाराजांच्या जीवनावर तयार होत असलेल्या डॉक्युड्रामा (डॉक्युमेंट्री) ला डॉ. सतीश साळुंके यांचा व्हाईस ओव्हर (पार्श्वआवाज) देण्यात आला असून त्याचे रेकॉर्डिंग नुकतीच कोल्हापूर स्टुडिओमध्ये पार पडली. हा डॉक्युड्रामा जवळपास ५० मिनिटांचा असून डॉ. साळुंके यांचा व्हाईस ओव्हर ३३ मिनिटांचा आहे. या ऐतिहासिक डॉक्युड्रामाची संहिता प्रसिद्ध इतिहासकार इंद्रजीत सावंत यांनी लिहिले असून कोल्हापूरचे प्रसिद्ध दिग्दर्शक किरणसिंह चव्हाण यांनी त्यास दिग्दर्शन केले आहे तर ऋषिकेश कुलकर्णी हे डबिंग व्हॉइस ओव्हरचे रेकॉर्डिंग इंजिनियर आहेत. शाहू महाराजांच्या जीवनावरील अत्यंत विस्तृत व दर्जेदार अशा या डॉक्युड्रामामध्ये आपणास व्हॉइस ओव्हरचे देता आला याचा मला विलक्षण आनंद वाटतो अशी प्रतिक्रिया डॉ. सतीश साळुंके यांनी व्यक्त केली. भारदस्त आवाज आणि भाषाशैली यासाठी साळुंके व्हॉइस ओव्हर जगतात ओळखले जातात.



उजवीकडून इतिहासकार इंद्रजीत सावंत, डॉ. सतीश साळुंके, किरणसिंह चव्हाण आणि ऋषिकेश कुलकर्णी.

# अभ्यासतील सातत्याने यशाला गवसणी!

## शैक्षणिक : आदित्य महाविद्यालयाच्या विद्यार्थ्याची निवड

बीड/पुण्यभूमी प्रतिनिधी

शहरातील नामवंत आदित्य शिक्षण संस्थेच्या आदित्य अन्नतंत्रज्ञान महाविद्यालयाचा विद्यार्थी अनिकेत बाभुळकर याची ड्इख बँकेच्या उच्चपदी (ड्लरश्रश १ जषष्ळलशी) म्हणून निवड झाली आहे. या निवडीबद्दल त्याचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.



बीड शहरातील आदित्य शिक्षण संस्था ही विद्यार्थ्यांना घडवणारी संस्था म्हणून नावारुपाला आलेली आहे. येथील विद्यार्थी भारतासह परदेशात मोठ–मोठ्या पदावर कार्यरत आहेत. आदित्य अन्नतंत्रज्ञान महाविद्यालयाच्या एका विद्यार्थ्याने पुन्हा यशाची पताका फडकवली आहे. ड्इख या नामांकित बँकेच्या उच्चपदी (ड्लरश्रश १ जषष्ळलशी) पदी निवड झाली आहे. या निवडीबद्दल अनिकेत बाभुळकर याचे आदित्य शिक्षण संस्थेचे मुख्य प्रवर्तक सुभाषचंद्रजी सारडा, संचालक डॉ. आदित्य सारडा यांच्यासह वसंतराव नाईक कृषी विद्यापीठ परभणीच्या कार्यकारी सदस्य तथा आदित्य शिक्षण संस्थेच्या संचालिका डॉ. आदिती सारडा यांनी अभिनंदन करत पुढील वाटचाली शुभेच्छा दिल्या.

बीडच्या आदित्य शिक्षण संस्थेतील विद्यार्थ्यांना योग्य वेळी योग्य मार्गदर्शन मिळत असल्यामुळे तेथील विद्यार्थी पुढे जावून चांगल्या पदावर दिसतात. अनिकेत बाभुळकर यांची ड्इख बँकेच्या उच्चपदी (ड्लरश्रश १ जषष्ळलशी) म्हणून निवड झाली. या यशाबद्दल आदित्य अन्नतंत्रज्ञान महाविद्यालयाचे प्राचार्य श्याम भुतडा, उपप्राचार्य ए.यु. सोळंके, प्रा.जी.एम. गुजर, प्रा. पी.एस. राठोड, प्रा. एम.ए. पुंडे यांनी अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या.

# शंभरी गाठलेला टोमॅटो,पुन्हा चाळीशीत

## बाजारभाव: भुईमुगाची आवक घटली,शेंगांना शंभरीचा भाव

कडा/पुण्यभूमी प्रतिनिधी

आठवडी बाजारात टोमॅटोच्या दरात अचानक आलेली तेजी अवघ्या आठवडाभरातच ओसरली, आता टोमॅटोचा दर शंभर रुपयांवरून पुन्हा एकदा चाळीस रुपये पर्यंत खाली आला.

मागील रविवारी आठवडी बाजारात टोमॅटोचे दर अचानक वाढून शंभर रुपये प्रति किलो पर्यंत पोहोचले होते. टोमॅटोच्या दरात आलेल्या तेजीमुळे ग्राहक आणि विक्रेते चकित झाले होते. मात्र पुन्हा एकदा टोमॅटोचा हा भाव झपाट्याने खाली घसरला असून, हाच दर आता तीस ते चाळीस रुपये किलो असा झाला. या अचानक तेजीचे कारण समजू शकले नाही. मात्र मागणी जास्त आणि पुरवठा कमी यामुळे असे झाले असावे. असे काही विक्रेत्यांचे म्हणणे आहे. दरम्यान बाजारात भुईमुगाची आवक घटल्यामुळे भुईमुगाच्या शेंगा शंभर रुपये प्रति किलोपर्यंत विक्री केल्या जात आहेत. तर बटाट्याचा दर ही वाढून पन्नास रुपयापर्यंत पोहोचला आहे. पावसाच्या पाण्याच्या उपलब्धतेमुळे कोथिंबीर आणि मेथी मात्र स्वस्त झाली. कोथंबिर पाच ते दहा रुपये जुडी आणि मेथी दहा रुपयांना असा त्यांचा सध्याचा आठवडी बाजारात भाव झाला आहे.

## कपिल मस्के नगराध्यक्ष बनसोडांना न्याय म्हणजे फिर्यादीवर अन्यायच!

# वेळप्रसंगी न्यायालयात धाव घेणार!

केज/पुण्यभूमी प्रतिनिधी

केजच्या नगराध्यक्षा सौ. सिताताई बनसोडे यांना जिल्हाधिकाऱ्यांकडून मिळाला दिलासा असून विनापरवाना बांधकाम केल्या प्रकरणाचा माजी नगरसेवक कपिल मस्के यांचा अर्ज जिल्हाधिकाऱ्यांनी नामंजूर केला आहे.या बाबतची सविस्तर माहिती अशी की,केज नगरपंचायतच्या नगराध्यक्षा सौ. सीताताई प्रदीप बनसोड या संवैधानिक पदावर म्हणजेच नगराध्यक्षा पदा वर राहून त्यांनी केज शहरातील महात्मा फ ुले नगर येथील त्यांच्या मालकीचे घर नं.३१३१ या घराचा बांधकाम परवाना न घेताच सौ. सीताताई बनसोड या बांधकाम करीतआहेत.सौ.सिताताई प्रदीप बनसोडे यांना अनधिकृत बांधकाम केल्यामुळे महाराष्ट्र नगर परिषदा,नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम१९६५ चे कलम ४४,४४(ई) नुसार अपात्र घोषित करण्यात यावे.या साठी अपिल दाखल केले होते.नगराध्यक्ष सिता बनसोड या चुकीचे विनापरवानगी घर बांधकाम करत आहेत असे समजताच माजी नगरसेवक कपिल मस्के यांनी पुरावे गोळा करण्याचे काम चालू केले याची चाहूल लागताच नगराध्यक्षांनी ते घर दत्तात्रय हंडिबाग यांना नोटरी करून दिले व ते मी केंव्हाच दत्तात्रय हंडिबाग यांना विकले असे दाखवण्यात आले.आता दत्तात्रय हंडिबाग हे कोण हे सगळा तालुका ओळखतो तसेच जे वर्तमान पत्र कधी तरी छापले जाते अश्या वर्तमान पत्रात त्याचे प्रकटन केले जे की कुणाच्या लक्षात येऊ नये.त्यानंतर अपिल केल्या नंतर खोटी नोटरी,वर्तमानपत्रातील प्रकटन अश्या चुकीच्या गोष्टी मुळे निकाल हा नगराध्यक्षाच्या बाजूने लागला.पण मी जी लढाई लढत होतो त्यात नैतिकी माझा विजय झाला आहे.कारण ज्या वार्डाच त्या प्रतिनिधित्व करतात त्यांना व केज शहरातील प्रत्येक नागरिकास माहीत आहे ते घर कोणाचे आहे. त्या मुळे न्याय वगैरे काही झाली नसून जिल्हाधिकारी यांची दिशाभूल केली गेली आहे.तसेच आपल्या नगराध्यक्ष पदाचा पुरेपूर गैरवापर केल्याचे मी पुरावे घेऊनमी पुन्हा आपिलात जाणार किंवा वेळ प्रसंगी न्यायालयात जाणार असे कपिल मस्के म्हणाले आहेत.



# जरंडी ग्रामसभेत अनेक प्रश्नांचा भडीमार!



सोयगाव/पुण्यभूमी प्रतिनिधी

तालुक्यातील जरंडी ग्रामपंचायतची सोमवारी अकरा वाजता सरपंच स्वाती पाटील यांना यांच्या अध्यक्षतेखाली महिला ग्रामसभा घेण्यात आली.

या ग्रामसभेत महिलांनी विविध अडचणी उपस्थित केल्या यामध्ये जरंडी गावातील सर्रासपणे विक्री होत असलेल्या अवैध दारू विक्री बंद करा तसेच नवीन मंजूर झालेल्या रेशन दुकानाबाबत चर्चा करून सदर दुकान सुरू करा आदी विषय हाताळले यामध्ये लाडकी बहीण यावर ग्रामविकास अधिकारी सुनील मंगरुळे यांनी मार्गदर्शन केले गावात शंभर टक्के शौचालय वापर करावा असा ठराव घेण्यात आला त्याच प्रमाणे सुंदर माझं गाव योजनेत महिलांनी सहभाग नोंदवावा वृक्ष लागवड नियोजन ग्रामसभेत करण्यात आले मुख्यमंत्री वयोश्री योजनेची माहिती देण्यात आली त्याच प्रमाणे अवैध दारू विक्री विरोधात महिलांनी मतदान घेऊन दारू विक्री बंद करण्या बाबत विषय चर्चिला यावेळी ग्रामविकास अधिकारी सुनील मंगरुळे लिपिक संतोष कुमार पाटील सतीश बाविस्कर भास्कर निकम आदींनी पुढाकार घेतला

सुविचार - वेळ अमूल्य आहे. प्रत्येक क्षणाला मोल द्या.

# राहुल गांधी सुसाट....!


लोकसभा निवडणुकीत काँग्रेस आणि सोबतच 'इंडिया' आघाडीला मिळालेल्या भरीव यशामुळे विरोधी पक्षातील अनेक नेत्यांचा आत्मविश्वास चांगलाच वाढलेला आहे. गेल्या दोन लोकसभांमध्ये विरोधक कायमच पराभवाच्या मानसिकतेत वावरत होते, त्यामुळे सभागृहात अगदी एकसुरी वातावरण पाहायला मिळायचे. त्या काळात सभागृहात सरकारला जेरीस आणण्याऐवजी कामकाजावर बहिष्कार टाकून सभात्याग करण्यातच विरोधक धन्यता मानायचे. त्यामुळे सरकारवर कोणताही वचक नव्हता, त्यातच लोकसभेत भाजपला स्वबळावर बहुमतापेक्षा अधिक जागा असल्यामुळे भाजपचे सहकारी पक्षदेखील पदरात पडेल ते पवित्र मानून घ्यायचे. या लोकसभेत चित्र बदललेले दिसत आहे. भाजपने सत्ता आपल्याकडे राखण्यात यश तर मिळविले; परंतु बहुमताचा आकडा स्वबळावर गाठण्यात भाजप अपयशी ठरला. त्यामुळे प्रथमच भाजपला सहकारी पक्षांना विचारात घेऊन, त्यांचे मत जाणून कारभार करावा लागत आहे. या सहकारी पक्षांचा दबाव कसा काम करीत आहे, याचे प्रत्यंतर अर्थसंकल्पात दिसून आले. भाजपला लोकसभेत बहुमत असते तर आंध्र प्रदेश आणि बिहारवर इतकी कृपादृष्टी नक्कीच दाखविली गेली नसती. दुसरीकडे लोकसभेतील विरोधकांची उपस्थितीदेखील मोदी सरकारची परीक्षा पाहणारी ठरत आहे. 'पप्पू', 'शहजादे' अशा शेलक्या विशेषणांनी ज्या राहुल गांधींची भाजप नेते कायमच कुचेष्टा करीत आले तेच राहुल गांधी या लोकसभा निवडणुकीनंतर पार बदलले असल्याचे दिसते. विरोधी पक्षनेतेपद स्वीकारलेल्या राहुल गांधींनी आपल्या आक्रमक भाषणातून सरकारला घाम फोडण्याचे काम केले आहे. लोकसभा निवडणुकीत 'इंडिया' आघाडीला थोडक्यात पराभव स्वीकारावा लागला असला तरी ते शल्य आणि कोणत्याही विरोधी नेत्याच्या बोलण्यातून जाणवत नाही, उलट आपल्या वाढलेल्या ताकदीच्या जोरावर मोदी सरकारला जेरीस आणण्यासाठी संपूर्ण विरोधक एकजुटीने काम करीत असल्याचे दिसते. राष्ट्रपतींच्या अभिभाषणावरील चर्चेत सहभागी होताना राहुल गांधींनी केलेल्या आक्रमक आणि मुद्देसूद भाषणामुळे सत्ताधारी पक्ष चांगलाच हवालदिल झाला होता. राहुल गांधींच्या भाषणात स्वतः पंतप्रधान मोदींनी अडथळे आणण्याचे प्रयत्न केले, यातच राहुल गांधींचा विजय होता. आपल्या त्या भाषणादरम्यान राहुल गांधींनी उपस्थित केलेल्या मुद्यांना उत्तर देताना मोदींना अनेकदा घाम पुसावा लागला. राहुल गांधी केवळ दणकून भाषण करीत आहेत असे नव्हे तर या भाषणांच्या माध्यमातून भाजपच्या राजकारणालाच धक्के देण्याचे काम ते करीत आहेत आणि याचा ताजा प्रत्यय अर्थसंकल्पावरील त्यांच्या भाषणातून आला. मोदी सरकार अदाणी, अंबानींचेच लाड करते, हा आरोप राहुल गांधींनी निवडणूक प्रचारात केला होताच, आताही याच आरोपाचा पुनरूच्चार करीत भाजपला 'बॅकफूट'वर ढकलण्यात ते यशस्वी होताना दिसत आहे. भाजपचे नेते अलीकडील काळात 'फेक नॅरेटीव्ह' बद्दल खूप बोलत असतात. कदाचित राहुल गांधींचे किंवा विरोधकांचे हे 'फेक नॅरेटीव्ह' असेलही; परंतु तुमची सत्याची बाजू लोकांना पटत नाही, त्यांचा या 'फेक नॅरेटीव्ह'वर अधिक विश्वास बसत आहे, हे वास्तव स्वीकारायला भाजप नेते तयार नाहीत. एका निवडणुकीत दणका बसताच लोक अपप्रचाराला बळी पडतात, हा शोध भाजप नेते लावत असतील तर आजवर याच लोकांनी, याच मतदारांनी त्यांना अनेक निवडणुकांमध्ये विजय मिळवून दिला, याचा त्यांना सोईस्कर विसर पडत असल्याचे दिसते. राहुल गांधी भाजपच्या दुखऱ्या भागावर आघात करीत आहेत आणि त्याचा मुकाबला कसा करावा, हे अजूनही भाजप नेत्यांच्या लक्षात आलेले नाही. अर्थसंकल्पावर बोलताना राहुल गांधींनी सहा लोकांच्या चक्रव्यूहात देशाची सामान्य जनता अभिमन्यूप्रमाणे अडकली आहे, असा आरोप केला, या आरोपात तथ्य असो अथवा नसो, सामान्य लोकांना राहुल गांधींचे म्हणणे पटत आहे. अर्थसंकल्प तयार करणाऱ्या चमूत मागास जातीतील किंवा अल्पसंख्याक समाजातील अधिकाऱ्यांचा समावेश नाही, हा राहुल गांधींचा युक्तिवाद अगदीच बालिश वाटत असला तरी अल्पसंख्याक आणि मागास वर्गातील लोकांना हा युक्तिवाद चटकन पटू शकतो. स्वतः राहुल गांधींना आपण काय बोलत आहोत, याचे पूर्ण भान असते, ते जाणीवपूर्वक भाजपच्या विरोधात एक जाळे निर्माण करीत आहेत. भाजपच्या मतपेढीला या लोकसभा निवडणुकीत विरोधकांनी मोठे खिंडार पाडले आहे, ते अधिक रूंद करण्याचे काम या अशा भाषणातून राहुल गांधी करीत आहेत. भाजप मूठभर उद्योगपतींचे आणि समाजातल्या उच्चवर्णियांचे हित जोपासणारा पक्ष आहे, हे 'नॅरेटीव्ह' मग ते 'फेक' असो वा नसो, अतिशय प्रभावीपणे लोकांपर्यंत पोहचविण्यात राहुल गांधी यशस्वी होत आहे. त्यांच्या या सुनियोजित आक्रमणापुढे सध्या तरी भाजप हतबल झाल्याची दिसते.

# सोईची सोयरिक ....!

महाराष्ट्राला आता विधानसभा निवडणुकीचे वेध लागले आहेत. विधिमंडळाचे पुढचे अधिवेशन निवडणुकीनंतरच होणार असल्याने सगळ्याच पक्षांचे आमदार आता आपापल्या मतदारसंघात पुढच्या बांधणीत गुंतल्याचे दिसते. महाविकास आघाडी असो अथवा महायुती सध्या जे आमदार आहेत त्यांना धक्का लावण्याची जोखीम घेणार नाही. काही किरकोळ अपवाद वगळले तर बहुतेक विद्यमान आमदार पुन्हा लढतीच्या रिंगणात असतील; परंतु लढतीचे चित्र मात्र बरेचसे बदललेले असेल. मागच्या वेळी सुटसुटीत मामला होता. भाजप-सेना युती आणि काँग्रेस-राष्ट्रवादी काँग्रेस आघाडी असा थेट सामना असल्यामुळे मतदारसंघातील गणित फारसे किचकट नव्हते, आता तसे राहिलेले नाही. राष्ट्रवादीचे जे आमदार अजित पवारांसोबत आहेत त्यांच्या विरोधात शरद पवारांच्या राष्ट्रवादीचे उमेदवार उभे ठाकतील, तेच शिवसेनेच्या बाबतीत होईल. शिंदे गटाच्या आमदारांसमोर ठाकरे गटाचे उमेदवार शड्डू ठोकतील. त्या तुलनेत भाजप आणि काँग्रेससमोर फारशी डोकेदुखी नाही; परंतु विद्यमान आमदारांना उमेदवारी दिल्यानंतरही शिल्लक उरत असलेल्या जागांचा पेच दोन्ही बाजूंना त्रासदायक ठरू शकतो. शिवाय मागच्या निवडणुकीत ज्या ठिकाणी भाजप आणि सेनेच्या उमेदवारांची राष्ट्रवादी काँग्रेससोबत लढत झाली, त्या ठिकाणी गोंधळ निर्माण होण्याची शक्यता आहे. अजित पवार गट भाजपसोबत असल्यामुळे त्या जागांवर राष्ट्रवादीला यावेळी दावा करता येणार नाही; परंतु त्या मतदारसंघात आमदारकीचे स्वप्न पाहणारे राष्ट्रवादीचे सध्या अजित पवारांसोबत असलेले नेते अस्वस्थ झाल्याचे दिसते. आपल्या पक्षासाठी जागा सुटणार नाही, हे लक्षात येताच त्यांच्यापैकी काहींनी शरद पवार गटाकडे कूच केली आहे. त्याचा फायदा शरद पवार गटाला होत आहे, या गटाला आयता उमेदवार मिळत आहे. ही अडचण केवळ अजित पवार गटाचीच नाही तर जवळपास सगळ्याच पक्षांना या अडचणीचा सामना कमी-अधिक प्रमाणात करावा लागणार आहे. आमदारकीसाठी इच्छुक उमेदवार मतदारसंघाचे गणित लक्षात घेऊन आता सोईच्या सोयरिकी जुळविण्याच्या कामाला लागले आहेत. जिकडून उमेदवारी मिळण्याची शक्यता आहे तिकडे त्यांची धाव राहणार आहे आणि या धावकांचे प्रमाण आता उत्तरोत्तर वाढतच जाणार आहे.

## स्थित्यंतर

# राजकारण फिरते शरद पवारांभोवती!



राही भिडे
9867521049

लोकसभेच्या निवडणुकीनंतर महाराष्ट्राला आता विधानसभेच्या निवडणुकीचे वेध लागले असून त्यासाठी सर्वच राजकीय पक्ष तयारीला लागले आहेत. तयारीमध्ये प्रामुख्याने एकमेकांविरूद्ध शिवीगाळ करणे नित्याचे झाले आहे. महाराष्ट्राच्या राजकारणात कधी नव्हता एवढा अत्यंत खालच्या पातळींवर प्रचार होत आहे. या पार्श्वभूमीवर शरद पवार यांचा प्रचार लक्षवेधी ठरला आहे. निवडणुकीला तीन महिने असताना ते एकही दिवस न थांबता महाराष्ट्र पिंजून काढत आहेत. राज्यातील सहा प्रमुख राजकीय पक्षांपैकी सध्या पवारांच्या पक्षात प्रवेश घेणाऱ्यांची संख्या सर्वाधिक असून महाराष्ट्राचे राजकारण पुन्हा एकदा पवार यांच्या भोवती फिरत आहे, असे चित्र आहे. राज्यात सत्ताधारी महायुती आणि विरोधी महाविकास आघाडी या दोन प्रमुख आघाड्यात सध्या जागा वाटपासाठी बैठकांमागून बैठका चालू आहेत. दुसरीकडे राज्यात तिसरी आघाडी आकाराला येण्याची शक्यता व्यक्त होत आहे. ॲड. प्रकाश आंबेडकर यांची वंचित बहुजन आघाडी, शेतकरी संघटना आणि अन्य पक्ष एकत्र येण्याचा विचार करीत आहेत. त्यासंदर्भात बैठका सुरू आहेत. विधानसभेच्या निवडणुकीत मतदारसंघ लहान तसेच विजयी उमेदवार आणि पराभूत उमेदवारातील मतांचा फरक अतिशय कमी असतो. त्यामुळे अधिक उमेदवार उभे राहिल्यास निवडणुकीचे गणित बदलू शकते. किती राजकीय पक्ष मैदानात उतरतात, यावर निवडणुकीतील समीकरणे बदलण्याची शक्यता आहे. महाराष्ट्र नवनिर्माण सेनेने राज्यात २२५ ते २५० जागा लढवण्याचा निर्णय घेतला असला, तरी राज ठाकरे या निर्णयावर ठाम राहणार का, हा प्रश्न अनुत्तरीत आहे. त्याचे कारण मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि राज ठाकरे यांचे संबंध अतिशय सलोख्याचे आहेत. राज ठाकरे यांनी राज्यात स्वबळावर निवडणूक लढवायचे ठरवले, तर त्याचा जास्त फटका महायुतीला बसण्याची शक्यता आहे, तर मुंबईत मात्र राज यांच्या मनसेचे उमेदवार महायुतीच्या पथ्यावर पडू शकतात. वंचित बहुजन विकास आघाडी, शेतकरी संघटना व अन्य संघटना एकत्र येऊन निवडणूक लढवली, तर त्याचा फटका मात्र महाविकास आघाडीला बसण्याची शक्यता आहे. एकीकडे हे चित्र असताना दुसरीकडे मात्र महाराष्ट्रातील मतदार सजग झाला असून कोण कुणाच्या फायद्यासाठी निवडणूक लढवतो, याचा तो विचार करायला लागला आहे. लोकसभेच्या निवडणुकीत वंचित बहुजन आघाडीला मतदान केले, तर भाजपला फायदा होईल हे गणित मनात पक्के ठरवून वंचित बहुजन विकास आघाडीची मते महाविकास आघाडीकडे वळली. विधानसभेच्या निवडणुकीतही मतदार असाच विचार करण्याची शक्यता नाकारता येत नाही. लोकसभेच्या निवडणुकीत डाव्यांना एकही जागा देता आली नव्हती; परंतु आता शरद पवार यांनी वारंवार शेतकरी कामगार पक्ष, अन्य समविचारी पक्षांना जागा सोडण्याची भूमिका बोलून दाखवली आहे.

डहाणू तसेच राज्यातल्या अन्य काही मतदारसंघात डाव्या आणि पुरोगामी विचारांच्या उमेदवारांसाठी जागा सोडल्या जाण्याची शक्यता आहे. पवार यांनी एकीकडे बेरजेचे राजकारण सुरू केले असताना दुसरीकडे महायुतीत मात्र वजाबाकीचे राजकारण सुरू आहे की काय अशी शंका घ्यायला जागा आहे.


भाजपने वारंवार अजित पवार यांची महायुतीला गरज असल्याचे सांगून आणि राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या नेत्यांचे मतपरिवर्तन करण्याचा प्रयत्न केला; परंतु भाजपबरोबर युती करणे म्हणजे मतसंख्येत घट करणे असा अर्थ काढला जात आहे. त्यामुळे अजित पवार समर्थक अस्वस्थ आहेत. त्यांचाही अजित पवार यांच्यावर दबाव वाढला असून संघ परिवार आणि भाजपतील काही नेते टीका करीत असतील, तर येथे थांबण्यापेक्षा तिसऱ्या आघाडी सोबत जाऊन निवडणूक का लढवू नयेत, अशी विचारणा ते करीत आहेत. त्यातच भाजपच्या पुण्याच्या महाअधिवेशनात केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी शरद पवार यांच्यावर ज्या भाषेत टीका केली, ती भाषा अजित पवार यांच्या समर्थक आमदारांनाही रुचलेली नाही. त्यापैकी काहींनी तर उघड उघड आपला विरोध दर्शविला आहे. त्याला भाजपच्या काही आमदारांनी उत्तर दिले आहे. त्यातून अजित पवार यांचा राष्ट्रवादी काँग्रेस आणि भाजप यांच्यातच कलगीतुरा रंगला आहे. लोकसभेच्या निवडणुकीत शरद पवार यांना मिळालेले यश, त्या तुलनेत अजित पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसचे झालेली घसरण पाहता आता अजित पवार यांच्या गटातील काही आमदार स्वगृही परतू शकतात. विधानपरिषदेच्या निवडणुकीत अजित पवार यांनी स्वतःच्या गटाचे आमदार एकत्र ठेवले असले आणि आणखी पाच आमदार फोडले असले, तरी विधानपरिषदेची परिस्थिती विधानसभेत राहील असे नाही. नरहरी झिरवळ यांच्यासह काही आमदार शरद पवार यांच्यासोबत येऊ शकतात. सध्या विधानसभेतील आमदारांची संख्या लक्षात घेतली, तर शरद पवार यांच्याकडे सर्वात कमी आमदार आहेत; परंतु गेल्या काही दिवसातील घटना, घडामोडी पाहिल्या तर शरद पवार यांच्या पक्षात येणाऱ्यांची संख्या सर्वाधिक आहे. त्यात भाजपतील माजी आमदारांची संख्या जास्त आहे. यावरून निवडणुकीतील वारे कोणत्या दिशेने वाहत आहेत हे लक्षात येते.

अन्य राजकीय पक्ष जरी विधानसभेच्या जागांचा आकडा सांगून काहीही दावा करीत असले, तरी महाविकास आघाडी टिकवण्याची जबाबदारी असलेले शरद पवार मात्र अजून राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्ष किती जागा लढवणार हे सांगत नाही. कोणत्याही परिस्थितीत महाविकास आघाडी तुटणार नाही याची दक्षता ते घेत आहेत. महाविकास आघाडीच्या जागा वाटपाचे सूत्र निश्चित झाले असून बैठकांनाही वेग आला आहे. त्यासाठी समिती स्थापन करण्यात आली आहे. दुसरीकडे भाजपच्या समन्वय समितीच्या बैठकीत कोणत्याही परिस्थितीत दीडशेपेक्षा कमी जागा लढवायच्या नाहीत, असा निर्धार करण्यात आला आहे. त्याचवेळी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेने शंभरपेक्षा कमी जागा लढवणार नाही अशी भूमिका घेतली आहे. या दोन राजकीय पक्षाची भूमिका विचारात घेतली, तर विधानसभेच्या अडीचशे जागा या दोन पक्षातच वाटून घेतल्यानंतर अन्य राजकीय पक्षांसाठी ३८ जागा उरतात. त्यात राष्ट्रीय समता पक्ष, भारतीय रिपब्लिकन पक्ष, रयत क्रांती, प्रहार संघटना व अन्य पक्षांना किती जागा देणार हा प्रश्नच आहे. अजित पवार यांच्या पक्षाने ऐंशी जागांचा आग्रह कायम ठेवला आहे. दिल्लीत शाह यांच्यासोबत महायुतीच्या वारंवार बैठका होत आहेत. जागांचे केलेले दावे पाहता हे त्रांगडे कसे दूर करणार हा प्रश्नच आहे. काँग्रेस आणि शिवसेनेने २८८ मतदारसंघाचा स्वतंत्र आढावा घेतला असला, तरी ती चाचपणी आहे. कोणत्याही परिस्थितीत महाविकास आघाडी तुटणार नाही याची खात्री दिली जात आहे. यावेळी जागा वाटपाचे अधिकार राज्य पातळीवरील समितीला काँग्रेसने दिले आहेत. समितीतील सदस्यांची नावे पाहता एक दोन अपवाद वगळता कोणीही आक्रस्ताळेपणा करणार नाही. शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेसने मात्र उद्धव ठाकरे, जयंत पाटील, स्वतः शरद पवार आणि खासदार संजय राऊत यांच्यावरच बहुतांश जबाबदारी सोपवल्याचे दिसते. मराठा, ओबीसी आरक्षणाचा प्रश्न सोडविण्याकरिताही पवारांच्याच मार्गदर्शनाची प्रतीक्षा. महाराष्ट्रातील विधानसभेची ही निवडणूकपूर्व परिस्थिती लक्षात घेतली, तर महाराष्ट्राचे राजकारण शरद पवार यांच्या भोवती कसे फिरते आहे आणि भाजपच्या नेत्यांनाही महाराष्ट्रात येऊन शरद पवार यांनाच का लक्ष्य करावे लागते आहे, या मागचे इंगित पवार यांचे महाराष्ट्रात असलेले स्थान हेच आहे.

## सरळ-सरळ

# 'बच्चे बिगड गए, बहुत देख-भाल से...'

मुले आनंदी असले की त्यांचेकडे विशेष लक्ष देणे, प्रेम करणे, उत्सव करणे, नाचणे, असे केले पाहिजे. ज्यामुळे त्यांचा कल आयुष्यभर निरोगी, स्वस्थ राहण्याकडे वाढेल. आजारी राहण्याकडे नाही. मनोवैज्ञानिकाच्या मते जगात ७० टक्के आजार हे मानसिक आहेत. अनेकवेळा आजार आपण आकर्षित करुन घेत असतो. तेव्हा निरोगी राहण्याच्या जीवनपद्धतीने मुलांना जोडून ठेवल्यास ७० टक्के आजार नष्ट होऊ शकतात.



राजेश राजोरे
9822593903

**चुप-चाप बैठे रहते हैं,कुछ बोलते नहीं,**
**बच्चे बिगड गए हैं, बहुत देख-भाल से**

सद्यस्थितीत मुले कशी सांभाळावीत? हा प्रश्न खूप बिकट बनला आहे. वास्तविक हा प्रश्न गंभीर होण्यासाठी प्रथमतः छोटे कुटुंब, कमी मुले, त्यांचे नाहक लाड पुरविणे, त्यांना लहानपणापासून लहान-मोठ्या गोष्टी, कामे न शिकविणे, शिक्षणासाठी चिंता व बाहेरची केलेली व्यवस्था, आदी खूप गोष्टी कारणीभूत आहेत. त्यातही मुले आणि त्यांचे आरोग्य, त्यांची दिनचर्या, खाण्या-पिण्याच्या बिघडलेल्या सवयी, झोपण्याची बदललेली वेळ तर त्यांचा 'स्क्रीन टाईम' (मोबाईल, कॅम्प्युटर, टीव्ही वगैरे), क्रिडांगणापासून दुरावा, आदी सर्व गोष्टी चिंता निर्माण करणाऱ्या तसेच कमी वयात त्यांच्या विविध आजारांना निमंत्रण देणाऱ्या ठरल्या आहेत. एकूणच 'मुले आणि त्यांचा सांभाळ' हा विषय गहन चर्चेचा व उपाययोजना करण्याचा झालेला आहे. तर 'माता-पिता को ओशो का अपूर्व संदेश,' हे प्रवचन खूप प्रेरणादायी आहे.

प्रत्यक्षात सर्व मुले सारखी नसतात. तसेच ग्रामीण भागातील मुले आणि शहरी भागातील मुले यामध्येही खूप फरक आहे. ग्रामीण भागातील मुले जबाबदार, अनुभव प्राप्त व समजुतदारपणा यामध्ये आघाडीवर असतात. कारण ती लहान असतांनाच घरगुती किंवा शेतीच्या कामात मदतीसाठी जुंपली जातात. किमान घरातील लहान सामान आणणे, शेतात डबा पोहचविणे, भावंडांचा सांभाळ करणे, स्वयंपाक करणे शिकणे व इतरही कामे करतात. त्या तुलनेत शहरातील मुले अशी कामे करीत नाहीत किंवा पालकांनी अशा जबाबदाऱ्या त्यांचेवर टाकलेल्या नसतात. वास्तविक मुलांची नाहक चिंता करणे व गरजेचे नाही ते देऊन लाड पुरविणे, आणि सुविधा देणे, ही अनावश्यक बाब आहे.

पूर्वीच्या काळात किशोरावस्था नव्हतीच. ७-८ वर्षाची मुले कामाला लागायची. आता २५-३० वर्षाचा झाला तेव्हा कामाला लागतो. तोही कामाला लागेलच याचा भरवसा नाही. उलट १८ ते २५ वर्षाची तरुण मुले जास्त उपद्रव करतात. कारण ते रिकामे असतात, त्यांच्या हाताला ताकद असते, ते जाळपोळ, तोडफोड असे कृत्य करतात. पूर्वी २५ हे वय मोठ्या माणसाचे धरले जायचे. या वयात डोक्यावर जबाबदाऱ्या येत असत, त्यातून अनुभव येवून समजूतदारपणा यायचा, २५ वर्षाचा होतांना एवढे अनुभव गोळा व्हायचे की तो आताच्या सुशिक्षीत तरुणांसारखा उद्दामपणे वागूच शकत नव्हता.

आज आपण विद्यार्थ्यांना शिकवितो. मात्र त्यांना जीवन जगण्याचा खरा धडा शिकण्यापासून वंचित ठेवतो. आजची लहान मुले स्वतःहून कपडे घालत नाहीत. ते रडतात कशासाठी? तर जेवण न करण्यासाठी, पूर्वीच्या काळात जेवण भेटत नव्हते म्हणून रडायचे तर आताच्या काळात हे जेवण नको, जेवणच नको, असे सांगून रडतात. आई मात्र मुले जेवत नाही म्हणून त्रस्त होते. मुले वेगळेच काहीतरी खायला मागतात.

वास्तविक आजच्या मुलांकडे २४ तास 'लक्ष' पाहिजे. पालकांनी जास्त लक्ष द्यायला नको. मुले जेव्हा आजारी पडतात किंवा कशाने त्रस्त असतात तेव्हा पालक जास्त लक्ष देतात व लाड करतात. प्रत्यक्षात त्यावेळी औषध देऊन झोपविले पाहिजे यापेक्षा जास्त लक्ष देऊ नये. कारण लक्ष देण्याचा चुकीचा संबंध जुळल्या जातो. आणि मुले सतत आजारी राहण्याकडे, आजारी असल्याचे दाखविण्याकडे प्रवृत्त होतात. परीक्षा आली की आजारपण येते, ही त्यातीलच एक बाब आहे. कारण यामुळे परीक्षेत नापास होणे, कमी गुण मिळणे, परीक्षा न देणे असे फायदे होतात. तसेच 'आजारी होते, काय करणार?' असे सांगितल्याने सुविधाही मिळतात. वास्तविक आजारपणात सेवा केली पाहिजे, नाहक चिंता, लक्ष देवू नये. 'नर्स सारखे करावे, तेथे नाहकचे मातृत्व दाखवू नये,' असे मनोवैज्ञानिक म्हणतात.

आपण आजारी असलो तरच आपल्याकडे लक्ष दिल्या जाते, लाड पुरिवले जातात, असे मुलांना वाटू लागते, हे चुकीचे ठरते. त्यापेक्षा मुले आनंदी असले की त्यांचेकडे विशेष लक्ष देणे, प्रेम करणे, उत्सव करणे, नाचणे, असे केले पाहिजे. ज्यामुळे त्यांचा कल आयुष्यभर निरोगी, स्वस्थ राहण्याकडे वाढेल. आजारी राहण्याकडे नाही. मनोवैज्ञानिकाच्या मते जगात ७० टक्के आजार हे मानसिक आहेत. अनेकवेळा आजार आपण आकर्षित करुन घेत असतो. तेव्हा निरोगी राहण्याच्या जीवनपद्धतीने मुलांना जोडून ठेवल्यास ७० टक्के आजार नष्ट होऊ शकतात. एवढे मात्र खरे!

शेवटी मुलांना लहानपणापासून जबाबदारी घेणे शिकवावे, या आशयाचा एक शेर आठवतो...

**जिम्मेदारियों की एक खूबी होती हैं,**
**ये आपको कभी बिगडने नहीं देती...**

(लेखक हे दैनिक देशोन्नतीच्या बुलडाणा आवृत्तीचे संपादक आहेत.)
खामगाव, जि. बुलढाणा

## अवकाश

# चला चंद्रावर राहायला!



प्रा. सुरेश चोपणे
9822364473
खगोल अभ्यासक अध्यक्ष- स्काय वॉच ग्रुप

अनेक वर्षाच्या अंतरानंतर गेल्या काही वर्षांपासून चंद्रमोहिमा वाढल्या आहेत. त्यात चीन, भारत, अमेरिका, जपान आणि इसा या खगोल संस्थांनी आपापल्या मोहिमा चंद्रावर पाठविल्या आहेत. या मोहिमा एवढ्या का वाढल्या आहेत, याचा विचार केल्यास लक्षात येईल की इतर ग्रहावर मोहिमा पाठविण्यापेक्षा, वैज्ञानिक क्षमता वाढविण्यासाठी आणि विविध प्रयोग करण्यासाठी चंद्रावर मोहिमा करणे परवडणारे आहे. त्यामुळे भारतासहित अनेक देश आपापली वैज्ञानिक क्षमता चंद्रावर तपासीत आहेत. चंद्रावरील यश हेच इतर ग्रहावर जाण्यास कारणीभूत ठरणार आहे. तिथे स्वतंत्र किंवा आंतरराष्ट्रीय सहाय्याने एक अभ्यास, संशोधन केंद उभारून दुर्बिणी उभारणे, तिथून अवकाशात यान पाठविणे आणि विविध प्रयोग करणे हे शक्य आहे. भविष्यात चंद्रावर महागडे का होईना पर्यटन विकास करण्याची संधी आहे आणि भविष्यात तेथील अमूल्य खनिजे काढता येऊ शकतात. अशा अनेक कारणासाठी तिथे चंद्र मोहिमा पाठविल्या जात आहेत. याहीपेक्षा महत्त्वाचे म्हणजे तिथे मानवाला जाऊन काही दिवस राहता, फिरता आले पाहिजे. आज आपण जसे पृथ्वीभोवती शेकडो उपग्रह पाठवले असून तिथे सतत जाणे येणे सुरू आहे, तसेच भविष्यात आपण सतत चंद्रावर जाणार आहोत.

**चंद्रावर संशोधन केंद्र होणार-** चंद्र हा आज आपल्यासाठी विविध अवकाशीय चाचण्या करण्याचे साधन झाले आहे. अतिशय कमी गुरुत्वात विविध प्रयोग केल्यामुळे पुढील दूरच्या अवकाश मोहिमेत याचा फायदा होतो. अलीकडे चीन आणि अमेरिकेला चंद्रावर आपले अवकाश स्टेशन असावे असे वाटते. त्याचाच भाग म्हणून नासाची आर्टमिस मोहीम असून जवळजवळ १० वर्षात याला सुरवात होईल. चंद्राला अवकाश केंद्र करण्याचा महत्त्वाचा फायदा म्हणजे तेथून दुसऱ्या ग्रहावर यान पाठविणे हे पृथ्वीपेक्षा खूप स्वस्त आणि सोयीचे आहे. तसेच पृथ्वीच्या कक्षेत दुर्बिणी पाठविण्यापेक्षा चंद्रावर दुर्बिणी उभारणे हे तांत्रिकदृष्ट्या उपयोगाचे आहे..एकूणच जो देश अभियांत्रिकी आणि तंत्रज्ञानामध्ये पुढे असेल तोच चंद्रावर आपले केंद्र उभारेल त्याला अवकाश संशोधनाच्या जास्त संधी राहतील.

**चंद्रावर व्यावसायिक उत्खनन सुरू होईल-** भविष्यात व्यावसायिक आणि संशोधनाच्या दृष्टीने तेथील खनिजे अत्यंत उपयुक्त ठरतील. तेथे जेसीबी रोबोट्स उत्खननाचे काम करू शकतील. चंद्र हा बहुतांशी पृथ्वीप्रमाणे बेसाल्ट आणि त्यात असणाऱ्या खनिजापासून बनला असला तरी चंद्रावर पडलेल्या उल्का आणि धुमकेतूतून जी अमूल्य खनिजे पडली ती आजही तिथे सुरक्षित आहेत, त्यातील स्कँडियम, यात्रियमसारखी खनिजे मोबाईल-कॉम्पुटरमध्ये उपयोगाची आहेत, ती शोधून आणता येईल. जसे सोने, चांदी, हिरे, निकेल, प्लॅटिनम, रोडियम, टगस्टन असे धातूसुद्धा आहेत, भविष्यात चंद्राची मागची बाजू ही संशोधनासाठी खूप उपयोगाची राहणार आहे, म्हणूनच भारताने दक्षिण धृवावर चंद्रयान उतरविले होते. मात्र, अशा मोहिमासाठी नवे कायदे आणि आंतरराष्ट्रीय कायद्यातसुद्धा बदल करावा लागेल.

**पर्यटनाची मोठी संधी-** पर्यटन हे आजच्या जगातील देशाना आर्थिक सुबत्ता मिळवून देणारे माध्यम आहे. अलीकडे अवकाश पर्यटनासाठी प्रयत्न केल्या जात आहे; परंतु अजून पृथ्वीवरून सहज विमानासारखे उड्डाण घेणारे पुनर्वापर होणारे यान होण्याच्या प्रतीक्षेत आहे. एकदा हे असे यान विकसित झाले, की नंतर असेच यान चंद्रावर जायला सोयीस्कर होणार आहे; परंतु यासाठी २०४० पर्यंत वाट पाहावी लागेल. चंद्रावरील पर्यटन स्थळात अपोलो ११ स्थळ, भारताची लँडीग साईट साउथ पोल, चंद्रावरील मोठी विवरे, पृथ्वीवरून दिसणारे मोठे विवर, इ. यासाठी स्पेस एडवेचर, स्पेस एक्स, ब्लू ओरिजिन इ. कंपनी अवकाश पर्यटनासाठी प्रयत्नात आहेत. त्यात ३ प्रकारचे पर्यटन असेल- एक चंद्राजवळून जाऊन आणणे, दुसरे चंद्राच्या कक्षेत नेवून आणणे आणि तिसरे चंद्रावर उतरणे. तुम्हाला यापैकी कोणते पॅकेज हवे ते बुक करावे लागेल.

**चंद्रावर राहण्यासाठी प्रयत्न होईल-** चंद्रावर पाणी असल्याची, तिथे काही प्रमाणात ऑक्सिजन आणि हायड्रोजन असल्याची चांगली बातमी असली तरी तेथील गुरुत्व कमी असल्याने अवकाश यात्रीच्या हाडे आणि स्नायुंना नुकसान होऊन कँसरची भीती असते. चंद्रावरील २०० डिग्री उच्च आणि २०० उणे तापमान असते आणि सूर्याचे रेडिएशन ही अवकाश यात्रींसाठी एक मोठी शारीरिक समस्या आहे. यावर मात करणे हे वैज्ञानिक डॉक्टरांसाठी एक मोठे आव्हान असून त्यावर उपाय शोधणे आवश्यक आहे. चंद्रावर टेरा फॉर्मिंग सारखा करता येईल, तिथे एका सुरक्षित बंद तंबूच्या आत पृथ्वी सारखे हवामान करता आले तर मानवाला अनेक दिवस राहता येऊ शकेल. तर चला आपण वाट बघू या एखाद्या टूर कंपनीची.

## वाचक विचार मंच

# परदेशात शिकण्यासाठी जाणाऱ्यांची संख्या वाढली...




आता विद्यार्थी अनेक कारणामुळे परदेशी शिकण्यास जातात. यामध्ये परदेशातील अनेक विद्यापीठात शैक्षणिक फी कमी असणे तसेच नोकरीच्या संधी याचाही विचार केला जातो. आजकाल अमेरिका, कॅनडा तसेच जर्मनी या देशात नोकऱ्या लगेच मिळतात. याशिवाय उच्च दर्जाचे राहणीमान असते. साहजिकच अनेकांचा ओढा परदेशात शिकण्यासाठी जाण्याचा असतो. एका आकडेवारीनुसार २०२४ मध्ये सुमारे १३लाख ३५ हजार विद्यार्थी परदेशात शिकत आहेत. सन २०२२ मध्ये सात लाख, २०२३ मध्ये ९ लाख, तर २०२४ मध्ये तब्बल १३ लाखाहून अधिक अशी वाढती संख्या आहे. कोरोनाच्या साथीच्या काळात ही संख्या कमी झाली होती आता परत यामध्ये वाढ दिसून येते. बाहेर शिकण्यासाठी जाणाऱ्या देशांपैकी विचार केल्यास सर्वात जास्त विद्यार्थी कॅनडात शिकत आहेत. त्यांची संख्या ४ लाख २७ हजार एवढी आहे, तर खालोखाल अमेरिकेत तीन लाख ३७ हजार, तर ब्रिटनमध्ये एक लाख ३७ हजार विद्यार्थी शिकत आहेत. ऑस्ट्रेलिया तसेच जर्मनी व रशियामध्येसुद्धा शिकणाऱ्यांची संख्या मोठ्या प्रमाणात आहे. रशियामध्ये अनेक विद्यार्थी मेडिकल शिक्षणासाठी जातात. देशात विविध सुविधा व योग्य शैक्षणिक शुल्क असल्यास अनेक विद्यार्थी देशातच शिक्षण घेऊ लागतील. खरेतर याबाबतीत योग्य तो अभ्यास व्हावयास हवा.

**शांताराम वाघ**, पुणे
मो.नं.:+९१ ९६२३४ ५२५ ५३
E mail: swagh30948@gmail.com

## गुल्लेर

# कामाचा एकही नाही...



नरेंद्र इंगळे
9561226572

'ओ माथने साहेब.. कधी होते तुमचा सर्व्हे? आमच्या वावरात पानी घुसलं.. पराटी दिसतच नाही.. पान्यात सळली सारी.. बत्तीस हजाराचं नुकसान झालं.'

'सर्व्हे होते ना.. एकही कास्तकार सुटत नाही. केंद्र सरकारनं दिड लाख कोटीचं पॅकेज जाहीर केलं कास्तकारासाठी.. निर्मलाबाई खुद बोलल्या संसदेत.'

'पॅकेज फक्त कागदावरच असते. गेल्या सालचे पैसे भेटले नाहीत मले.'

'पैसा कुठीच जात नाही. सरकारच्या मागं एक काम आहे काय?'

'सरकार रुपया काढते अन् चाराने हाती देते. बियाचे अन् खताचे भाव घेघाल वाढून देले.. थैल्यासाठी रांगा लावा लागल्या.'

'खताचं उत्पादन कमी अन् मागनी जास्त झाली होती त्या काळात'.

'आपला नंबर पह्यल्या यादीत लावजा... गेल्यासाली तुम्ही पार्सिलिटी केली. ढेरपोट्याचे नंबर पह्यल्या यादीत टाकले. ज्याचं वावर डुबलं नाही त्यालेही पैसे भेटले.'

'यंदा सरकारनं कास्तकारासाठी पायाभूत सुविधा आनल्या.'

'म्हनजे काय केलं?'

'म्हनजे तुमचा माल ठेवाले गोदाम बांधून भेटीन... फवाऱ्याचा पंप भेटीन... वेळेवर कर्ज भेटीन.'

'गोदाम बांधून काय करता? इकडे फवाऱ्याले मानूस भेटत नाही. आता या फुकटच्या योजना सुरु झाल्यापासून लोकं लयच अयदी झाले.. लाडका भाऊ.. लाडकी बईन.. सगळे फुकटावर भिडले. सरकारले म्हना फवाऱ्याले मानसं पाठवा.'

'गावात रिकामे कमी आहेत काय? हे जवान पोरं नेत जा फवाऱ्याले.'

'जवानच अयदी झाले. सगळे मोबाईलात तोंड घालून बसतात. ससरीचा एकही कामावर येत नाही. आमचाच पोरगा वावरात चक्कर मारत नाही.'

'त्याले सरकार काय करीन? तुम्ही पोराले वळन लावलं नाही.'

'ग्रॅज्युएट झाला तो.. आता सरकार ग्रॅज्युएटले दहा हजार रुपये मयना देते म्हटल्यावर तो कायले जाते वावरात दनके घ्याले? सगळे भुईले भार झाले. कामाचा एकही नाही.'

धुम्मस

### नाट्य नरेश

ते जडीबुटीवाले योगरत्न बाबा
स्त्री वेषात लपले होते
देवाभाऊंच्या वेषांतराचे
किस्से पेप्रात छापले होते

पुतण्याचा प्रताप ऐकून
आता चाट पडले काका
कधी कोण काय करेल
काहीच विचारू नका

मास्क, गॉगल, टोपी
हे फायनल केले शेवटी?

मुखवट्याआड दडलेली
किती ही करामती कवटी?

कसले तत्त्व? कसली निष्ठा?
हे पाण्यावरचे बुडबुडे
'दादा'गिरी, 'शहा'णपणा
चालत नाही सत्तेपुढे

चक्की पिसींगपेक्षा
हातमिळवणी बरी
म्हणूनच अंधारात
करायचे दिल्लीवारी

**ॲड. अनंत खेळकर**
अकोला

## संवाद

# मानवी हक्काचे कायदे कागदावरच प्रभावी!

देशातील मजूर व कामगारांचे हित रक्षण करण्यासाठी असलेला किमान वेतन कायदा १९४८ असो, कारखाने कायदा १९४८ असो किंवा लहान व अल्पवयीन मुला-मुलींच्या शिक्षणाचा हक्क अधोरेखित करणारा सन २०१९ चा शिक्षण हक्क कायदा... ऊसतोड कामगार व त्यांच्या कुटुंबांचे हलाखीचे आयुष्य पहिले तर त्यांच्यासाठी कोणत्या कायद्याचे संरक्षण मिळत नसल्याचे आणि त्यांच्या हक्काचे रक्षण होत नसल्याची दयनीय स्थिती आहे. किमान वेतन कायद्याप्रमाणे कामगारांना आठ तासांचेच काम देणे अपेक्षित आहे. शिवाय त्याहून अधिक कालावधीचे काम झाल्यास अतिकालिक (ओव्हरटाईम) भत्ता म्हणून दुप्पट वेतन मिळायला हवे. कारखाने कायद्यातील कलम ५१ अन्वये कामगारांना आठवड्यात ४८ तासांपेक्षा अधिक काम देता येत नाही; परंतु आपण सर्व जिथे तिथे पाहतो तर चित्र वेगळे दिसून येते. काही ठिकाणी तर ऊसतोड कामगार दिवसाचे १२ ते १६ तास काम करत असल्याचे आढळून आले. शिवाय त्यांना अतिकालिक (ओव्हरटाईम) भत्ता नावाचा कोणता प्रकारच नाही. त्यांना कोणत्याही प्रकारची सुट्टीही दिली जात नाही. ऊसतोड कामगारांना किमान वेतन कायदा लागू असल्याचा दावा सरकारी प्रशासन करत असल्याने वास्तविक त्यांचा मेहनताना लवादाकडून निश्चित व्हायला हवा; परंतु प्रत्यक्षात ऊसतोडीच्या या क्षेत्रात प्रामुख्याने कारखाना, शेतकरी, मुकादम यांच्या प्रतिनिधींकडून दर तीन वर्षांनी वेतन ठरते. कामगाराच्या प्रतिनिधींना माहिती दिली जात असली तरी कारखानदारांच्या मजबूत लॉबीमुळे कारखान्यांचा फायदा अधिक पाहून कामगारांचा किमान मेहनताना ठरवला जातो. मुंबई उच्च न्यायालयात प्रलंबित असलेल्या या याचिकेच्या पार्श्वभूमीवर अलीकडेच किमान मेहनताना प्रति टन ३३६ रुपये ठरविण्यात आला; परंतु इतक्या मजुरीवर गुजराण होऊ शकते का? असेच सवाल कामगारांकडून केले जात आहेत. जोपर्यंत किमान ५५०-६०० रुपये किमान मेहनताना होत नाही. तोपर्यंत आमच्या आयुष्यात फारसा फरक पडणार नसल्याचे कामगारांकडून दुःख व्यक्त होत आहे.

**प्रा. सचिन बादल जाधव**
पंढरपूर,
मो.नं.८४२५००३१२७

दररोजच्या घडामोडीसाठी वाचत रहा... पुण्यभूमी

## चीनमध्ये दरड कोसळल्याने १२ जण ठार




**बीजिंग :** चीनच्या हुनान या मध्य प्रांतात अतिवृष्टीमुळे दरडी कोशळल्याने १२ जण ठार झाले आहेत. हेंगयांग शहरातल्या विलेंज नावाच्या गावातल्या एका घरावर सकाळी ८ वाजण्याच्या सुमारास दरड कोसळून किमान ६ जण जखमी देखील झाले आहेत. या भूस्खलनामुळे घराचा काही भाग वाहून देखील गेला असून मातीच्या ढिगाऱ्याखाली १८ जण गाडले गेले आहेत.

बचाव पथकांनी ढिगाऱ्याखालून १२ जणांना जिवंत बाहेर काढले आहेत. डोंगरउतारावर झालेल्या संततधार पावसामुळे या दरडी कोसळल्या आहेत. मदत आणि बचावकार्यासाठी २४० जणांचे पथक घटनास्थळी रवाना करण्यात आले आहे. चीनच्या उत्तर आणि नैऋत्येकडील भागात सध्या सुरू असलेल्या मुसळधार पावसामुळे पूरस्थिती निर्माण झाली आहे.

## राजस्थानमध्ये ७ मुलांचा बुडून मृत्यू

**जयपूर :** राजस्थानमध्ये एकाच दिवशी दोन वेगवेगळ्या अपघातात सात निष्पाप मुलांचा तलावात बुडून मृत्यू झाला. या अपघातात सातही मुलांचा दुर्दैवी मृत्यू झाला. निष्पाप मुलांच्या मृत्यूमुळे त्यांच्या कुटुंबीयांमध्ये हळहळ व्यक्त होत आहे. हे दोन्ही अपघात अलवर जिल्ह्यातील मांडला गावात आणि दिडवाना जिल्ह्यातील केराप गावात झाले. मिळालेल्या माहितीनुसार, पहिला अपघात रविवारी संध्याकाळी पूर्व राजस्थानमधील अलवर जिल्ह्यातील रामगढ पोलीस स्टेशन हद्दीतील मांडला गावात झाला. तेथे गावाजवळील जोहाड येथे तीन मुले म्हशी चारण्यासाठी गेली होती. पाण्याने भरलेले तलाव पाहून त्यांना त्यात आंघोळ करण्यापासून रोखता आले नाही आणि ते पाण्यात उतरले. तलावात आंघोळ करत असताना तिघेही दलदलीत अडकले आणि बाहेर पडू शकले नाहीत. त्यामुळे तिन्ही मुलांचा मृत्यू झाला. या तीन मुलांसोबत गावातील आणखी एक मूल होते. तो तिथे खेळत होता. तीन मुले बुडत असल्याचे पाहून त्यांनी गावात जाऊन माहिती दिली.



यावर गावकरी आणि कुटुंबीय घटनास्थळी पोहोचले मात्र तोपर्यंत तिन्ही मुलांचा मृत्यू झाला होता. या घटनेनंतर संपूर्ण गावात शोककळा पसरली आहे. रामगड पोलिसांना घटनेची माहिती मिळताच डीएसपी ओमप्रकाश बिश्नोई, अतिरिक्त एसपी तेजपाल सिंह आणि पोलिस अधिकारी सवाई सिंह तेथे पोहोचले. मुलांच्या कुटुंबीयांनी शवविच्छेदन करण्यास नकार दिला. अलवरचे अतिरिक्त पोलीस अधीक्षक तेजपाल सिंग यांनी सांगितले की, अपघातात मृत्युमुखी पडलेल्या मुलांमध्ये एहसान (८), इंग्लिश (१०) आणि साबीर (७) यांचा समावेश आहे. त्यानंतर पश्चिम राजस्थानच्या डिडवाना जिल्ह्यातून एक वाईट बातमी आली की, डिडवानाजवळील केरप गावातील चार मुले आंघोळीसाठी गावापासून २ किलोमीटर अंतरावर असलेल्या तलावात गेली. तेथे आंघोळ करत असताना चौघेही तलावात बुडाले. यामुळे चारही मुलांचा मृत्यू झाला. घटनेची माहिती मिळताच दिडवाना डीएसपी, अतिरिक्त एसपी, अतिरिक्त जिल्हाधिकारी, खुनखुना पोलीस स्टेशन आणि इतर वरिष्ठ अधिकारी घटनास्थळी पोहोचले.



## ▪ संपर्क क्रांती एक्स्प्रेस डबे सोडून इंजिन पळाले
## ▪ रेल्वे अपघातांची मालिका सुरूच

# बिहारमध्ये मोठा रेल्वे अपघात टळला

**पाटणा :** देशात रेल्वे अपघातांची मालिका सुरूच आहे. बिहारच्या समस्तीपुरमध्ये सोमवारी संपर्क क्रांती एक्स्प्रेसचा भीषण अपघात सुदैवाने टळला आहे. दरभंगा येथून दिल्लीला जात असलेल्या बिहार संपर्क क्रांती एक्स्प्रेस पूसा आणि कर्पुरीग्राम स्थानकांच्यामध्ये दोन भागात विभागली गेली. ट्रेनचे इंजिन दोन बोगींना घेऊन तब्बल शंभर मीटर पुढे पळाले आणि बाकीचे डब्बे मागेच राहिले. ही घटना कर्पुरीग्राम आणि पूसा स्टेशन दरम्यान रेपुरा गुमटी जवळ झाली आहे. कपलिंग तुटताच डब्यातील प्रवाशांना मोठा झटका बसला आणि घाबरलेल्या प्रवाशांमध्ये एकच गोंधळ उडाला.

गाडीचे कपलिंग उघडल्याने आणि इंजिनसह दोन्ही बोगी वेगळ्या झाल्यामुळे जोरदार धक्का बसल्याचे ट्रेनमध्ये उपस्थित प्रवाशांनी सांगितले. यामुळे सर्वजण घाबरले. मात्र सुदैवाने आतापर्यंत कुठलीही हानी झालेली नाही. सुमारे शंभर मीटर पुढे गेल्यावर चालकाने इंजिन बंद केले. त्यानंतर कसेबसे इंजिन मागे घेऊन दुसरी बोगी जोडून गाडी संथ गतीने पुसा स्थानकात आणण्यात आली.

अपघाताची माहिती मिळाल्यानंतर रेल्वेचे पथक घटनास्थळी पोहोचले आणि ट्रेनच्या कपलिंगची पडताळणी सुरु केली आहे. सध्या १२.४५ ही ट्रेन पूसा स्थानकावर थांबली होती. रेल्वेचे अनेक तांत्रिक अधिकारी पूसा स्थानकावर उपस्थित होते. मात्र अपघाताबाबत सांगण्यास टाळाटाळ करत होते. माध्यमांनी रेल्वेशी संपर्क करण्याचा प्रयत्न केला, मात्र अधिकाऱ्यांनी या अपघाताबाबत काही बोलण्यास नकार दिला. त्यांनी एवढेच सांगितले की, या अपघाताचा तपास सुरु असून त्यानंतर हा अपघात कसा झाला याबाबत बोलले जाऊ शकते. सुदैवाने या अपघातात कोणतीही जिवीतहानी झाली नाही.

## काय बिनसलेय? योगींनी फक्त राजनाथसिंह यांना हात जोडून नमस्कार केला!


### जितेंद्र आव्हाड यांची पोस्ट

**ठाणे :** लोकसभा निवडणुकींच्या निकालांमध्ये भाजपची मोठी घसरण झाली आहे. भाजपला पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या चेहऱ्यावर, स्वबळावर सत्ता स्थापन करता आली नाही. यामागे महाराष्ट्रातील जनतेच्या मनातील असंतोष हे कारण स्पष्ट दिसत आहे. त्यासोबतच उत्तर प्रदेशातही भाजपच्या जागांमध्ये झालेली घसरण आहे. पण भाजपची उत्तर प्रदेशातील घसरण यावरून भाजपमधे अंतर्गत काही गडबड असल्याचे समोर आले आहे.अशातच आता राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाचे नेते जितेंद्र आव्हाड यांनी एक व्हिडीओ ट्विट केला आहे. हा व्हिडीओ भाजपच्या मुख्यमंत्र्यांच्या बैठकीच्यावेळी झालेल्या फोटोसेशनचा आहे.



## हॅरिस यांच्यामुळे अमेरिकेचा मृत्यू होईल

### डोनाल्ड ट्रम्प यांची टीका



**वॉशिंग्टन :** कमला हॅरिस यांच्यामुळे अमेरिकेत गुन्हेगारी, अनागोंदी, गोंधळ आणि अमेरिकेचा मृत्यू होईल, अशा शब्दात रिपब्लिकन पक्षाचे उमेदवार डोनाल्ड ट्रम्प यांनी हॅरिस यांच्यावर पुन्हा एकदा टीका केली आहे. अमेरिकेच्या अध्यक्षपदाच्या निवडणुकीसाठी आता १०० दिवसांचाच अवधी शिल्लक राहिलेला असताना दोन्ही पक्षांच्या प्रमुख उमेदवारांकडून जोरदार टीका केली जाऊ लागली आहे.

बायडेन यांच्या अध्यक्षपदाच्या कार्यकाळात अमेरिकेत निर्माण झालेली अनागोंदी आपणच दूर करू शकतो. कायदा आणि सुव्यवस्था आणि व्यवस्था पुन्हा प्रस्थापित करूशकतो,असे ट्रम्प यांनी म्हटले आहे.कमला हॅरिस यांनी डिस्ट्रीक्ट ॲटर्नी म्हणून सॅन फ्रान्सिस्कोचा नाश केला आहे. त्या मूळच्या मार्क्सवादी ॲटर्नी होत्या. देशाच्या अध्यक्ष झाल्या तर त्या देशाचाही नाश करतील, असे ट्रम्प म्हणाले. हॅरिस इतक्या टोकाच्या आणि निर्लज्ज आहेत की त्यांनी बेकायदेशीर घुसखोर आणि कट्टरपंथी इस्लामिक दहशतवाद या शब्दांना निषिद्ध आणि अस्वीकार्य असल्याचे म्हटले होते, असा आरोपही ट्रम्प यांनी केला. बायडेन-हॅरिस यांच्या प्रशासनाच्या काळात सुरू करण्यात आलेले अमेरिकचे एकल खुली सीमा धोरण अध्यक्षपदी निवड झाल्याच्या पहिल्याच दिवशी रद्द केले जाईल. देशाच्या सर्व सीमा सील केल्या जातील आणि देशात होणारी घुसखोरी थांबवली जाईल, असेही ते म्हणाले. बायडेन यांना डेमोक्रॅटिक पक्षाने माघार घेण्यास भाग पाडले आहे. हे कृत्य म्हणजे डेमोक्रॅटिक पक्षाने केलेले बंड आहे. ज्या व्यक्तीने १४ दशलक्ष मते मिळवली, त्याच्याविरोधातले हे बंडच आहे. बायडेन यांना निवडणूक लढवायची होती. मात्र पक्षाला ते नको होते. हे तर अध्यक्षांविरोधातले बंडच आहे. कारण बायडेन यांना राज्यघटनेतील २५ व्या घटनादुरुस्तीची धमकी देण्यात आली होती, असे ट्रम्प म्हणाले.

## काँग्रेसच्या माजीमंत्र्यांच्या घरासमोर शेतकऱ्यांचे ठिय्या आंदोलन




**सोलापूर :** ऊस घालून नऊ महिने उलटले आहेत तरीही शेतकऱ्यांना बिल मिळत नसल्याने धाराशिव जिल्ह्यातील उमरगा आणि तुळजापूर या भागातील ४०० शेतकऱ्यांनी ऊस बिल मिळावे, यासाठी काँग्रेसचे माजीमंत्री सिद्धाराम म्हेत्रे यांच्या घरासमोर सोमवारी (दि.२९) ठिय्या आंदोलन सुरू केले. जोपर्यंत ऊस बिल मिळत नाही, तोपर्यंत ठिय्या आंदोलन मागे घेणार नसल्याचा इशारा यावेळी शेतकऱ्यांनी दिला आहे.

उमरगा व तुळजापूर भागातील हजारो शेतकऱ्यांनी रुद्देवाडी येथील मातोश्री साखर कारखान्याला नोव्हेंबर महिन्यात ऊस घातला. कारखान्याला ऊस घालून जवळपास आठ ते नऊ महिन्याचा कालावधी होवून गेला आहे. तरीही साखर कारखान्याकडून ऊस बिल मिळत नसल्याने वैतागलेल्या शेतकऱ्यांनी माजी आमदार म्हेत्रे यांच्या सोलापूर येथील घरासमोर आंदोलन सुरू केले आहे.

## चीनशी संबंध सुधारण्याचे इटलीचे प्रयत्न

### पंतप्रधान मेलोनी चीनच्या दौऱ्यावर



**बीजिंग :** इटलीच्या पंतप्रधान जॉर्जिया मेलोनी यांनी चीनशी संबंध सुधारण्याचा निर्णय घेतला आहे. त्या चीनच्या दौऱ्यावर रवाना झाल्या आहेत. ऑटो मॅन्युफॅक्चरिंग आणि इतर क्षेत्रांमध्ये चिनी गुंतवणूक आकर्षित केल्यामुळे इटलीला युरोपियन संघाशी व्यापार युद्धाची भीती सतावते आहे. तरिही मेलोनी यांनी चीनच्या भेटीचा निर्णय घेतला आहे. मेलोनी यांनी आज चीनचे पंतप्रधान ली कियांग यांची भेट घेतली. चीन आणि इटलीच्या उद्योजकांच्या परिषदेलाही त्या उपस्थित राहणार आहेत.

इटलीने काही महिन्यांपूर्वीच चीनच्या बेल्ट ॲन्ड रोड इनिशिएटिव्हमधून बाहेर पडण्याचा निर्णय घेतला आहे. या प्रकल्पांतर्गत जगभरात रस्ते आणि उर्जा प्रकल्पांच्या पायाबूत सुविधांची उभारणी केली केली जाणार आहे. यातून चीनला इतर देशांशी व्यापारी संबंध अधिक घट्ट करण्याची संधी मिळणार आहे. इटलीने २०१९ मध्ये बेल्ट ॲन्ड रोडमध्ये सामील होण्याचा निर्णय घेतला होता. तेंव्हा अमेरिका आणि चीनमध्ये व्यापारी युद्ध सुरू होते. त्यामुळे इटलीचा निर्णय हा युरोपशी केलेली बंडखोरी समजला जात होता. मात्र या प्रकल्पातून इटलीला अपेक्षित आर्थिक लाभ मिळत नसल्याचे इटलीच्या लक्षात आले. तसेच चीनबरोबरच्या जवळीकीमुळे युरोपाती इतर देशांशी इटलीचे संबंध बिघडले होते. त्यामुळे इटलीने या प्रकल्पातून बाहेर पडण्याचा निर्णय घेतला होता. मात्र तरिही इटलीला चीनबरोबरचे आर्थिक संबंध जपायचे आहेत. चीनच्या सहयोगातून वाहन उद्योगातील काही उद्योग इटलीला सुरू करायचे आहेत. मेलोनी या पाच दिवस चीनच्या दौऱ्यावर असणार आहेत.

## भाजप नेत्याचे स्वागत करणे काँग्रेस नेत्याला पडले महागात

### पक्षाने केली कारवाई

**इंदूर:** 'मध्य प्रदेशात एका भाजप नेत्याचे स्वागत करणं काँग्रेसच्या नेत्यांना चांगलच महागात पडलं आहे. मध्य प्रदेशमधील कॅबिनेट मंत्री आणि भाजपचे ज्येष्ठ नेते कैलाश विजयवर्गीय यांचं स्वागत केल्याप्रकरणी काँग्रेस नेत्यांवर पक्षानं कारवाई केली आहे. याप्रकरणी इंदूरच्या काँग्रेस शहर आणि ग्रामीण अध्यक्षांना पक्षानं निलंबित केलं आहे. तसंच, संघटन प्रभारी राजीव सिंह यांनी काँग्रेसचे शहराध्यक्ष सुरजीत चढ्ढा आणि ग्रामीण अध्यक्ष सदाशिव यादव यांना नोटीस बजावून ७ दिवसांत खुलासा मागवला आहे.

प्रदेश उपाध्यक्ष आणि संघटन प्रभारी यांनी नोटीसमध्ये लिहिलं आहे की, एक असा व्यक्ती, ज्यानं माता अहिल्याच्या नगरीत लोकशाही मूल्यांची हत्या केली. इंदूरच्या जनतेकडून मतदानाचा हक्क काढून घेऊन त्यांनी इंदूरची देश-विदेशात बदनामी केली, ज्याचा इंदूरच्या जनतेनं निषेधही केला. अशा व्यक्तीचं इंदूर जिल्हा काँग्रेस कमिटी गांधी भवनात स्वागत करणं, हे अनुशासनहीनतेच्या श्रेणीत येतं. तुम्ही तुमचं स्पष्टीकरण सात दिवसांत द्या. या कालावधीत तुम्हाला तुमच्या सध्याच्या पदावरून निलंबित करण्यात आलं आहे. अलीकडेच एक पेड माँ के नाम मोहिमेत काँग्रेसचा पाठिंबा घेण्यासाठी मंत्री कैलाश विजयवर्गीय आणि इतर भाजप नेते इंदूरमधील जिल्हा काँग्रेस कार्यालयात गेले होते.

यावेळी काँग्रेस कार्यालयात कैलाश विजयवर्गीय यांचं जंगी स्वागत करण्यात आलं. तसंच, त्यांना मिठाई सुद्धा भरवण्यात आली होती. दरम्यान, याबाबत काँग्रेसच्या काही नेत्यांनी विरोध दर्शविला होता. त्यानंतर आता याप्रकरणी काँग्रेस ग्रामीण व शहराध्यक्षांना निलंबित करण्यात आलं आहे.विजयवर्गीय यांनी अक्षय बम यांना भाजपमध्ये सामील करून घेतलं होतंलोकसभा निवडणुकीच्यावेळी कॅबिनेट मंत्री कैलाश विजयवर्गीय यांनी काँग्रेसचे उमेदवार अक्षय कांती बम यांना भाजपमध्ये सामील करून घेतलं होतं.

## भिवंडीतील पाच इमारतींवर हातोडा, विकासकाला आठ कोटींचा झटका

### हायकोर्टाचे आदेश



**ठाणे :** भिवंडीतील काल्हेर येथील पाच अनधिकृत इमारती पाडा, असे आदेश उच्च न्यायालयाने राज्य शासनाला दिले आहेत. या चार मजली इमारतींचे बांधकाम करणाऱ्या विकासकाने आठ कोटी रुपये न्यायालयात जमा करावेत. ही रक्कम इमारतींमधील घरमालकांना द्यावी, असेही न्यायालयाने आदेशात नमूद केले.

न्या. एम.एस. सोनक व न्या. कमल खाथा यांच्या खंडपीठाने हे आदेश दिले. या इमारती पाडण्याची जबाबदारी प्रामुख्याने एमएमआरडीए व ठाणे जिल्हाधिकारी यांची आहे. १ फब्रेवारी २०२५पर्यंत ही कारवाई करा. या कारवाईची माहिती न्यायालयात सादर करा, असे खंडपीठाने आदेशात नमूद केले आहे.

## राष्ट्रीय लोकन्यायालयात 64 हजार 722 प्रकरणे निकाली

### राज्यात नगर तिसऱ्या क्रमांकावर

**मुंबई :** राष्ट्रीय लोकन्यायालयामध्ये ६४ हजार ७२२ प्रकरणे निकाली निघाली आहेत. यामध्ये १ अब्ज ३८ कोटी २२ लाख ५१ हजार ३०४ रुपयांची वसुली झाली. राज्यात नगर जिल्हा तिसऱ्या क्रमांकावर आला आहे.

प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश सुधाकर यार्लगड्डा यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्ह्यातील सर्व न्यायालयामध्ये राष्ट्रीय लोकन्यायालयाचे आयोजन करण्यात आले होते. निवासी उपजिल्हाधिकारी राजेंद्रकुमार पाटील, जिल्हा सरकारी वकील ॲड. सतीश पाटील, नगर बार असोसिएशन अध्यक्ष ॲड. नरेश गुगळे, अतिरिक्त पोलिस अधीक्षक प्रशांत खैरे, पोलिस उपअधिक्षक (गृह) हरीश खेडकर,ॲड. भूषण बऱ्हाटे, ॲड. विक्रम वाडेकर, ॲड. सागर पदिर, ॲड.राजाभाऊ शिर्के, ॲड. पिंटू पाटोळे, ॲड.अंधारे आदी उपस्थित होते. जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाच्या सचिव न्यायाधीश भाग्यश्री पाटील यांनी प्रस्ताविक केले. ॲड. वृषाली तांदळे यांनी सूत्रसंचालन केले.

## सोनम वांगचूक पुन्हा उपोषण करणार

**लडाख :** लडाखला राज्याचा दर्जा आणि घटनात्मक संरक्षणाच्या मागण्यांवर सरकारने लडाखमधील कार्यकर्त्यांना चर्चेसाठी आमंत्रित केले नाही तर स्वातंत्र्य दिनी पुन्हा २८ दिवसांचे उपोषण सुरू करण्याचा इशारा पर्यावरणवादी कार्यकर्ते सोनम वांगचूक यांनी रविवारी दिला. लडाखमधील सर्वोच्च संस्था, लेह आणि कारगिल लोकशाही आघाडी यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या द्रास भेटी दरम्यान मागण्यांचे निवेदन सादर केले आहे.

## राम आता भाजपच्या हिंदुत्वाच्या डिक्शनरीतून नाहीसा झाला

### संजय राऊत यांची टीका

**मुंबई :** महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सोमवारी सहकुटुंब पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची भेट घेतली. यावेळी फडणवीसांनी मोदींना भगवान शंकराची मुर्ती भेट दिली. त्याबाबत बोलताना शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे नेते, खासदार संजय राऊत यांनी भाजपवर टीका केली आहे. 'भाजप आपल्या गरजेनुसार देवाचा वापर करते. आता भाजपवाले रामाला विसरले आहेत' असा टोला संजय राऊत यांनी फडणवीसांना लगावला.

'भाजपवाले आता रामाला विसरले आहेत. हेच भाजपचे वैशिष्ट्य आहे. आता राम त्यांच्या कामाचा राहिला नाही. कदाचित आता रामाला पुन्हा ते गर्भगृहात बंद करतील. त्यांचे देवांच्या बाबतील उत्खनन सुरुच आहेत.



**लिस्बन :** पोर्तुगाल येथून ग्रीसला जाणाऱ्या एका नौकेला भूमध्य सागरात पाच किलर्स व्हेल्सनी घेरले आणि समुद्रात बुडवले. एक कोटी रुपयांचीही ही नौका होती. तब्बल दीड तास व्हेल्स माशांनी नौकेला धडक देऊन ती तोडून टाकली.

## ...तर अमेरिकेत पुन्हा निवडणुका होऊ देणार नाही!

**वॉशिंग्टन :** अमेरिकेतील ख्रिश्चन धर्मीयांनी मला मत दिले तर त्यांना चार वर्षांनी पुन्हा मतदान करावे लागणार नाही याची मी काळजी घेईन, असे सांगत डोनाल्ड ट्रम्प यांनी नव्या वादाची ठिणगी टाकली आहे. पुन्हा मतदान करावे लागणार नाही म्हणजेच देशात पुन्हा निवडणुका होऊ देणार नाही हा यातील गर्भितार्थ अधोरेखित करत विरोधी पक्षनेत्यांनी टीकेची झोड उठवली आहे.ट्रम्प हे हुकूमशहा प्रवृत्तीचे आहेत. ते लोकशाही नष्ट करतील, असा दावा विरोधी नेत्यांनी केला आहे. शनिवारी फ्लोरिडामध्ये एका पुराणमतवादी गटाच्या कार्यक्रमात ट्रम्प यांनी वरील विधान केले होते. ख्रिश्चनांनी घराबाहेर पडून मला मतदान करावे. मग पुढील चार वर्षांत मी सर्व काही ठीक करेन. चार वर्षानंतर त्यांना पुन्हा मतदानासाठी यावे लागणार नाही.

## नवी मुंबईत ज्वेलरवर दरोडा

### बंदुकीचा धाक दाखवत लाखोंच्या दागिन्यांवर डल्ला

**नवी मुंबई :** नवी मुंबईत दरोडेखोरांनी ज्वेलर्सच्या दुकानात दरोडा घातला आहे. बंदुकीचा धाक दाखवत दरोडेखोरांनी लाखो रुपयांच्या दागिन्यांवर डल्ला मारला आहे.

नवी मुंबईच्या खारघरमध्ये बीए एम ज्वेलर्सचे दुकान आहे. रात्री १० च्या सुमारास तीन दरोडेखोर हेल्मेट आणि काळा रेनकोट घालून आले होते. त्यापैकी एका दरोडेखोराकडे बंदुक होती. त्याने हवेत गोळीबार करून आधी दहशत पसरवली. त्यानंतर ज्वेलर्समधल्या कर्मचाऱ्यांना धमकावले आणि दागिने बॅगेत भरायला सांगितले.

दरोडेखोरांनी ११ लाख ८० हजार रुपयांचा मुद्देमाल लंपास केला. तीन मिनिटांत या दरोडेखोरांनी चार ते पाच राऊंड फायर केले. यात एक व्यक्ती जखमीही झाली. त्यानंतर बाईगकवरून या दरोडेखोरांनी पोबारा केला.

## ट्रकने ट्रॅक्टर ट्रॉलीला दिलेल्या धडकेत 4 भाविकांचा मृत्यू

### १२ हून अधिक जखमी



**भोपाळ :** मध्य प्रदेशातील मुरेना जिल्ह्यात भीषण अपघात झाल्याची घटना घडली आहे, येथे एका भरधाव ट्रकने ट्रॅक्टर ट्रॉलीला दिलेल्या जबरदस्त धडकेत ट्रॅक्टर ट्रॉलीमधील चार भाविकांचा मृत्यू झाला आहे. तर १२हून अधिक जण जखमी झाले आहेत. जखमींना पोलिसांनी स्थानिकांच्या मदतीने रुग्णालयात दाखल केले आहे. तर दोघांना ग्वाल्हेर येथे हलविण्यात आले आहे. मिळालेल्या माहितीनुसार, हा अपघात राष्ट्रीय महामार्ग ४४ वर देवरी गावात घडला आहे. भाविक एका ट्रॅक्टरमधून खडियाहार गावातून उत्तर प्रदेशातील गंगा घाटावर कांवड यात्रेसाठी जात होते. दरम्यान देवरी गावाजवळ भरधाव ट्रकने भाविकांनी भरलेल्या ट्रॅक्टर ट्रॉलीला जबरदस्त धडक दिली. ही टक्कर इतकी भीषण होती की त्यात दोन भाविकांचा जागीच मृत्यू झाला तर अन्य दोघांचा रुग्णालयात नेताना मृत्यू झाला.

## ऑलिम्पिकचा फिव्हर अंतराळ स्थानकात पोहोचला

देशोन्नती वृत्तसंकलन

**न्यूयॉर्क :** पॅरिस ऑलिंपिकला सुरुवात झाली आहे आणि जगभरातले खेळाडू यामध्ये सहभागी झाले आहेत. दरम्यान नासाने स्पेस सेंटरमधील एक सुंदर व्हिडीओ शेअर केला आहे, ज्यामध्ये आंतरराष्ट्रीय स्पेस स्टेशनमध्ये अंतराळवीरांनाही ऑलिम्पिकचा फिव्हर चढला असून अंतराळस्थानकात ते आपले क्रीडाकौशल्य दाखवताना दिसत आहेत. यात कोणी रेसिंग लावतोय तर कोणी गोळा फेक करतेय. एवढेच नाही तर खेळाआधी सर्व अंतराळवीर मशालही पास करताना दिसत आहेत. स्पेस स्टेशनमध्ये खेळ खेळणाऱ्या अंतराळवीरांमध्ये हिंदुस्थानची अंतराळवीर सुनीता विलियम्सही दिसत आहे. सध्या त्यांचा व्हिडीओ सोशल मीडियावर प्रचंड व्हायरल होत आहे.

नासाने आपल्या एक्सच्या अकाऊंटवरुन एक व्हिडीओ शेअर केला आहे. ज्यामध्ये आंतरराष्ट्रीय स्पेस सेंटरमध्ये असलेले अंतराळवीर झिरो ग्रॅव्हीटीमध्ये मशाल घेऊन दिसत आहे. त्यानंतर हे अंतराळवीर वेट लिफ्टिंग, गोळा फेक आणि रनिंग आदी खेळ खेळताना दिसत आहेत. सोशल मीडियावर या व्हिडीओला प्रचंड पसंती दिली जात आहे.

या व्हिडीओ वर लोकांच्या विविध प्रतिक्रिया येत आहेत. एका यूजरने लिहीले की, ही तर ऑलंपिक वाईब्सची बेस्ट फिलिंग आहे, अन्य एका युजरने लिहीले की, ही तंत्रज्ञानाची दुनिया आहे अशा प्रतिक्रिया दिल्या आहेत. लोकांनी या व्हिडीओचे प्रचंड कौतुक केले असून प्रतिक्रियांमध्ये अंतराळवीर हे खेळ प्रचंड व्हायरल होत आहे. स्पेसमध्ये शून्य गुरुत्वाकर्षणामध्ये स्वतःला स्थिर ठेवणे फार कठिण होते. अशा परिस्थितीत अंतराळवीर आंतरराष्ट्रीय अंतराळ स्थानकात ज्या प्रकारे कामगिरी करत आहेत ते धक्कादायक आहे.

### अंतराळवीरांनी दाखवले आपले क्रीडाकौशल्य



# दशहत माजवत सशस्त्र दरोडा!

## भयभित : रोख रकमेसह मुद्देमाल लुटून पोबारा

कडा/पुण्यभूमी प्रतिनिधी

तालुक्यातील केरुळ येथील टेंभीच्या माळाजवळील भागवत वस्तीवर दोरडखोरांनी दशहत माजवत सशस्त्र दरोडा टाकला. मारहाण करत दरोडखोरांनी सुमारे लाखों रुपायांचा रोख रकमेसह मुद्देमाल लूटून पोबारा केला.या हल्ल्यात राजू महादेव भागवत (वय ३०) यांच्यावर सुमारे नऊ चाकुचे वार झाल्याने त्यांना नगर येथील खाजगी रूग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले.सोमवारी मध्यरात्री एक वाजेच्या सुमारास हा प्रकार घडला.

याबाबत घटनास्थळावरून मिळालेली माहिती अशी की, केरुळ येथील राजू महादेव भागवत यांच्या घरामध्ये सोमवारी मध्यरात्रीनंतर अज्ञात ८ ते ८ दरोडेखोर काठी, कुऱ्हाड,चाकू अशी हत्यारे घेऊन घरात घुसले. कुटुंबातील मुलासह सर्वांना काठीने मारहाण करत चाकूचा धाक दाखवून दहशत माजवली. दरम्यान दरोडेखोरांनी भागवत यांच्या घरातील रोख रकमेसह सोन्या-चांदीचे दागिने लूटले.भागवत यांच्या घरात दरोडेखोरांना विरोध करणाऱ्या राजू महादेव भागवत यांना मारहाण करत त्यांच्यावर चाकूने अनेक वार केल्यामुळे ते गंभीर जखमी झाले. त्यांना नगरच्या खाजगी रूग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले. हा दरोडा टाकल्यानंतर दरोडेखोरांनी घटनास्थळावरुन पलायण केले .गावात दरोडा पडल्याचे समजताच अनेकजण जमले. नागरिकांनी डायल ११२ वर माहिती दिली. त्यामुळे कडा पोलिसांची गाडी तात्काळ घटनास्थळी दाखल झाली. मात्र तोपर्यंत दरोडेखोर दूरवर गेले होते. दरोडेखोरांना पकडण्यासाठी पहाटेपासून आष्टी पोलिसांचा फौजफाटा सर्वत्र फिरत आहे. स्थानिक गुन्हे शाखेच्या कर्मचा-यांसह श्वान पथक देखील घटनास्थळी दाखल झाले आहे.





### आष्टी पोलिस मलिदा गोळा करण्यात व्यस्त

आष्टी शहरासह पोलीस ठाण्याच्या हद्दीत खाकीचा धाक संपल्यामुळे मोठ्या प्रमाणात अवैध धंदे फोफावले असून, याकडे पोलिस जाणून-बुजून अर्थपूर्ण डोळेझाक करीत आहेत. पोलिसांना एखाद्या घटनेचा तपास लावण्याऐवजी महाशय अवैध धंदेवाल्याकडून मलिदा गोळा करण्यात दंग असल्याची जोरदार चर्चा आहेत.

### आठ दिवसांत दुसरा दरोडा

मागील आठ दिवसापूर्वीच किन्ही येथील केरुळ रोडवरील काकडे वस्तीवर दरोडा पडला होता. यामध्ये जवळपास सव्वा लाखाचे मुद्देमाल चोरून कुटुंबातील व्यक्तींना जबर मारहाण झाली होती. अद्याप त्या घटनेचा तपास लागला नसतानाच किन्ही पासून पाच किलोमीटरवर अंतरावर असलेल्या केरुळ येथे हा दुसरा दरोडा पडला .याबाबत कार्यक्षमतेवर आणि तपासावर प्रश्नचिन्ह निर्माण होत आहे.



### दीड महिन्याच्या बाळाला मारण्याची धमकी

दरोडेखोरांनी भागवत यांच्या घरामध्ये प्रवेश करताच सोन्याच्या वस्तू व नगदी पैशाची मागणी करीत कुटूंबातील लोकांना जबर मारहाण करायला सुरुवात केली. निर्दयी दरोडेखोर एवढ्यावरच न थांबता त्यांनी दीड महिन्याच्या बाळाला उचलून घेऊन जाण्याची धमकी दिली. त्यामुळे राजू भागवत बाळाच्या दिशेने धावताच दरोडेखोरांकडून त्यांच्यावर शस्त्राने जबर वार करण्यात आले.

## जागर प्रतिष्ठानची कार्यकारणी बैठक

### धोरण : विविध विषयांवर चर्चा




वडवणी/पुण्यभूमी प्रतिनिधी

जागर प्रतिष्ठान महा.राज्य संघटनेच्या वडवणी तालुका कार्यकारणी ची तालुका स्तरीय बैठक वडवणी शहरातील रेणुका माता मंदिर येथे पार पडली ,बैठकीत संघटनेच्या पुढील वाटचाली संदर्भात चर्चा झाली तसेच लवकरच जागर प्रतिष्ठान चे वडवणी तालुका पदाधिकारी नियुक्त करण्यात येणार आहेत त्या विषयी सुध्दा चर्चा करण्यात आली तसेच गडकिल्ले संवर्धन व सामाजिक बांधिलकी जपण्यासाठी संघटना कटिबध्द असल्याचे सर्वांनी सांगितले या बैठकीला जागर प्रतिष्ठान चे संस्थापक अध्यक्ष किसन पाटील चव्हाण,बीड जिल्हाध्यक्ष संगम चाळक,विशाल जाधव,आदिनाथ शिंदे,जीवन सवासे,सुनील नाईकवाडे, विष्णू तोगे,अमोल मुंडे,विशाल शेळके ,राम लोणकर,ओम नरवडे,महेश चव्हाण,भैया चव्हाण,उमेश जकाते,वैभव जाधव,प्रशांत इंगळे, नाईकनवरे सर आदी.शिलेदार उपस्थित होते.

## गायरान जमिनीमुळे पद धोक्यात!

### दिलासा:सरपंच वंदना तपसेंचे सरपंचपद कायम

माजलगाव/पुण्यभूमी प्रतिनिधी



माजलगाव तालुक्यातील सोन्नाथाडी येथील झालेल्या ग्रामपंचायतीचे सार्वत्रिक निवडणुकीमध्ये जनतेमधून वंदना केरबा तपासे या सरपंच म्हणून निवडून आल्या असून त्या ग्रामपंचायत सोन्नाथाडी ता.माजलगाव जिल्हा बीड सरपंच पदाचा कार्यभार पाहत असून वंदना केरबा तपासे ह्या सरपंच म्हणून निवडून आल्यानंतर सरपंच वंदना केरबा तपासे यांनी गायरान जमिनीवर अतिक्रमण केलं असल्याने त्यांचे सरपंच पद तत्काळ रद्द करणेबाबत मां दिवाणी न्यायाधीश साहेब माजलगाव यांचे कोर्टात प्रकरण दाखल करण्यात आले होते परंतु सदर प्रकरणात सक्षा पुरावा चालू झाल्यानंतर प्रस्तूचे प्रकरण अर्जदार अचानकपणे काढून घेतल्याने सोन्नाथाडीचे सरपंच वंदना केरबा तपसे यांचे सरपंच पद कायम राहणार आहे सरपंच वंदना केरबा तपसे यांचे वतीने ड. व्हि.बी लवटे यांचे मार्गर्शनाखाली ड आर.के गवते यांनी काम पाहिले असून त्यांना ड एम. वि लांडगे यांनी सहकार्य केले.

## क्रीडांगण



**परळी :** राज्यस्तरीय कुराश स्पर्धेमध्ये ५० किलो वजन गटात सुवर्णपदक पटकावणारे दीपक गोविंदराव गीतेंचा परळी शहर पोलीस स्टेशनकडून सत्कार करण्यात आला.

## बेपत्ता झालेल्या महिलेचा मृतदेह आढळला

### खळबळ : दिंडीतून महिला झाली होती बेपत्ता

कडा/पुण्यभूमी प्रतिनिधी

पंढरपूरला वारीसाठी जाणाऱ्या दिंडीतील एक भाविक महिला मुक्कामाच्या ठिकाणावरून बेपत्ता झाली. १५ दिवसांनंतर तिचा मृतदेह सिना नदीपात्रात आढळला. आशा बर्डे (वय ४५, रा. खरवंडी, ता. नेवासा) असे मृत महिलेचे नाव आहे.



पोलीस सुत्रांकडून मिळालेली अधिक माहिती अशी की, अहमदनगर जिल्ह्यातील नेवासा तालुक्यातील खरवंडी येथील दिंडी पंढरपूरला जाताना आष्टी तालुक्यातील खुंटेफळ गावात मुक्कामी होती. यामधील ४५ वर्षीय भाविक महिला तिथून बेपत्ता झाली होती. आषाढी एकादशीनंतर दिंडीतील सर्व वारकरी आपापल्या घरी परतले. मात्र, महिला आली नसल्याने शोधाशोध सुरू झाल्यानंतर नातेवाइकांशी संपर्क साधला. याच दरम्यान सिना नदीपात्रात एका ४५ वर्षीय महिलेचा मृतदेह आढळून आल्याची माहिती मिळताच नातेवाइकांनी अंभोरा पोलिसांशी संपर्क साधला. सदर बेपत्ता महिलेचे वर्णन व मृतावस्थेत आढळलेल्या महिलेचे वर्णन मिळतेजुळते आढळून आल्याने नातेवाइकांनी शवविच्छेदना दरम्यान उपस्थित राहून ती महिला आशा जालिंदर बर्डे असल्याची खात्री पटविली. त्यानंतर मृतदेह नातेवाइकांच्या ताब्यात देण्यात आला. अशी माहिती अंभोरा पोलिसांकडून मिळाली आहे.

## भुरट्या गुत्तेदाराने पेयजल योजना लुटली!

### प्रश्नचिन्ह : कोट्यवधी मिळूनही योजना अर्धवट?

केज/पुण्यभूमी प्रतिनिधी

केज तालुक्यातील चिंचोली माळी येथील पेयजल योजनेचे काम अर्धवट राहीलेले असुन पेयजल योजनेचे काम करणारा भुरट गुत्तेदार कोण असा प्रश्न उपस्थित होतो आहे कारण कोट्यवधी रुपये योजने साठी माळालेले अससताना योजनेचे काम अर्धवट, तसेच अनेक गावाला पानी पीण्यसाठी पेयजल योजनेचे आहे परंतु योजना अर्धवट असल्याने पाणी मिळत नाही. पेयजल योजनेअंतर्गत चिंचोली माळी गायरान येथे झालेल्या प्रकल्पाच्या माध्यमातून आमदारा पंकजाताई मुंडे यांच्या भुरट्या गुत्तेदारांनी कोट्यवधी रुपयांचा निधी पाण्यात घालून भुरटा गुत्तेदार शेंगा हानत फिरत आहे ही लाजिरवाणा बाब आहे.आमदार पंकजाताई सारख्या नेतृत्वाचे नाव अशा






भुरट्या कार्यकर्त्यांन मुळे, गुत्तेदारांन मुळे खराब होत आहे पेयजल योजना ही आमदारा पंकजाताईनी लोकांना पाणी पुरवठा करण्यासाठी दिली होती का भुरटे पुढारी, गुत्तेदार पोसण्यासाठी दीली होती असे चर्चा सत्र नागरिकांन मध्ये सुरू झाले आहे कारण काम बोगस व अर्धवट निकृष्ट दर्जाचे असल्याने पेयजल प्रकल्पाचे उद्घाटन सुध्दा करण्यात आलेले नाही कारण भोगस व निकृष्ट दर्जाचे काम झालेल्या प्रकल्पाचे उद्घाटन करणाऱ्या आमदारा पंकजाताई नाहीत तरी अशा प्रकारे भोगस अर्धवट कामगीरी करणाऱ्या भुरट्या गुत्तेदारांन मुळे आमदारा पंकजाताई यांचे नाव खराब होत आहे चिंचोली माळी येथील भोगस अर्धवट निकृष्ट दर्जाचे काम झालेल्या प्रकल्पाचे काम पूर्ण होणार का पेयजल योजना पाण्यात घालनारा भुरटा गुत्तेदारावर कारवाई होणार असा प्रश्न नागरिकांना पडला आहे.

## हादगाव येथे शालेय साहित्य वाटप

### उपक्रम : पंकजाताई मुंडेंच्या वाढदिवसाचे औचित्य



केज/पुण्यभूमी प्रतिनिधी

केज तालुक्यातील हादगाव येथे लोकनेत्या आमदार आदरणीय पंकजातांई गोपीनाथराव मुंडे यांच्या वाढदिवसानिमित्त मौजे हादगांव ता केज जि बीड येथे जिल्हापरिषद शाळेत शालेय साहित्यासह, खाऊ वाटप करुन आमदारा पंकजाताई मुंडे यांचा वाढदिवस उत्साहात साजरा करण्यात आला.याप्रसंगी उपस्थित पंकजाताईचे निष्ठावंत खंदे समर्थक उपसरपंच श्रीराम वायबसे गावातील नागरिक उपस्थित होते .या विषयी सविस्तर वृत्त असे की आमदारा पंकजा मुंडे यांच्या वाढदिवसानिमित्त वेगवेगळ्या उपक्रम केज तालुक्यात राबविले गेले त्यांच पध्दतीने हादगाव येथील उपसरपंच श्रीराम वायबसे आमदारा पंकजाताई मुंडे यांचे खंदे समर्थक, युवानेते यांनी सुध्दा पंकजाताई मुंडे यांच्या वाढदिवसानिमित्त हादगाव येथील जिल्हापरिषद शाळेतील विद्यार्थ्यांना खाऊ,पेन,वही, इतर साहित्य वाटप करुन वाढदिवस उत्साहात साजरी करण्यात आला यावेळी उपस्थित शाळेतील शिक्षक तसेच गावातील नागरिक यांच्या उपस्थितीत आमदारा पंकजाताई मुंडे यांचा वाढदिवस हादगाव येथे साजरी करण्यात आला.

**ऋणानुबंध** अनिल जगताप,सचिन मुळूक यांचा उपक्रम

## पंधरा हजार विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य!

बीड/पुण्यभूमी प्रतिनिधी

सामाजिक उपक्रमामध्ये प्राधान्याने पुढाकार घेऊन समाजसेवेचा तप पूर्ण करणारे शिवसेना जिल्हप्रमुख मा. अनिलदादा जगताप तथा सचिनभैय्या मुळूक यांनी शिवसेना वर्धापन दिनानिमित्त बीड शहरातील पंधरा हजार शालेय विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप केले. बीड शहरातील कंकालेश्वर विद्यालय, महात्मा ज्योतिबा फुले विद्यालय, केएसपी विद्यालयासह अनेक शाळांमधील तब्बल पंधरा हजार विद्यार्थ्यांना काल दि. ३० जुलै रोजी शालेय साहित्य वाटप केले. याबरोबरच शाळेतील विद्यार्थी तथा शिक्षकांच्या समस्या जाणून घेतल्या व त्या समस्या सोडवण्यासाठी शिवसेना कठीबद्ध असल्याचे आश्वासन अनिलदादा जगताप आणि सचिनभैय्या मुळूक यांनी दिले.



यादरम्यान शाळा व्यवस्थापनाकडून अनिलदादा जगताप, सचिनभैय्या मुळूक यांचा पुष्पगुछ देऊन सत्कार करण्यात आला. हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे, धर्मवीर आनंद दिघे साहेब यांच्या विचारांना प्रेरित होऊन शिवसेनेचे धनुष्य आम्ही उचललेले आहे. आदरणीय बाळासाहेब ठाकरे आणि दिघे साहेब यांनी ऐंशी टक्के समाजसेवा आणि वीस टक्के राजकारण करण्याचे संस्कार आम्हा शिवसैनिकांना दिलेले आहेत. याबरोबरच महाराष्ट्र राज्याचे कर्तव्यदक्ष मुख्यमंत्री मा. एकनाथ शिंदे साहेब आणि डॉ श्रीकांत शिंदे साहेब यांची राज्यातील सामान्य आणि गरजू लोकांसाठी असलेल्या आत्मीयतेला समोर ठेऊन आम्ही बीड जिल्ह्यात समाजसेवा करण्याला अधिक प्राधान्य देत आहोत. सातत्याने सांस्कृतिक, क्रीडा तसेच शैक्षणिक क्षेत्रात मुलांना यशाची गगन भरारी घेता यावी यासाठी विविध उपक्रम राबवत त्यांना आधार देण्यासाठी प्रयत्न करत आहोत. आता विद्यार्थ्यांनी देखील जिद्द, चिकाटी आणि मेहनत घेऊन अभ्यास करावा आणि आपल्या आई-वडिलांचे जिल्ह्याचे तसेच राज्याचे आणि देशाचे नाव उज्वल करावे ही जिम्मेदारी तुम्हा सर्व विद्यार्थ्यांची आहे असे मत जिल्हाप्रमुख अनिलदादा जगताप तथा सचिनभैय्या मुळूक यांनी आपल्या मनोगत भाषणात मांडले आणि विद्यार्थ्यांना अत्यावश्यक असणाऱ्या शालेय साहित्याचे वाटप केले. याप्रसंगी शिवसेनेच्या सुमनताई गोरे सह संपर्कप्रमूख महिला आघाडी, अलकाताई डावकर सह संपर्कप्रमुख महिला आघाडी, रत्नमालाताई आंधळे महिला आघाडी जिल्हाप्रमूख, चंद्रकला ताई बांगर महिला आघाडी जिल्हाप्रमूख, सुनिल सूरवसे जिल्हा संघटक, योगेश नवले जिल्हा संघटक, संतोष जाधव उपजिल्हाप्रमुख, मकरंद उबाळे तालुकाप्रमुख बीड, संजय उडान नगरसेवक, राहुल कदम सरपंच यांच्यासह शिवसेना पक्षाचे कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## चिंचोली माळीत लोटला भक्तीचा मेळा!

### आध्यत्मिक : पुष्पाताई महाराज यांचे किर्तन



केज/पुण्यभूमी प्रतिनिधी

केज तालुक्यातील चिंचोली माळी येथे संतश्रेष्ठ श्री संत सावता महाराज सप्ताहातील तिसऱ्या दिवसाचे कीर्तन पुष्प ह भ प पुष्पाताई महाराज यांनी पुण्यवंत व्हावे ।घेता सज्ञनाची नावे ।।नेघे माझी वाचा तुटी । महालाभ फुकासाठी ।।या अभंगावर विवेचन करताना प्रपंचामध्ये राहून सुद्धा पुण्य कमवता येत आणि पुण्य कमवायचे असेल तर सज्ञनाचे म्हणजेच संतांचे नाव घेतल्यानंतर अथवा देवाचे नाव घेतल्यानंतर पुण्य प्राप्त होते आणि संताचे अथवा देवाचे नाव घेण्यासाठी काही किंमत मोजावी लागत नाही अगदी फुकट आहे एवढेच नव्हे तर मनुष्य जीवाचा विसावा संत आहेत किंवा देव आहेत म्हणून सज्ञनाचे नाव घ्यावे सज्ञनाच्या नाव घेण्याने नुसतं पुण्यच पदरात पडत नाही तर माणसाच्या हातून जे काही पापे घडली जातात हे सर्व पाप निघून जातात . तुका म्हणे पापे ।जाती संताचिया जपे ।।पुढे बोलताना संतश्रेष्ठ श्रीसंत सावता महाराज यांचं जीवन चरित्र अत्यंत उत्कृष्ट पद्धतीने त्यांनी सांगितलं की सावता महाराज कधीही पंढरपूरला गेले नाहीत त्यांनी कांदा मुळा भाजी अवघी विठाई माझी या सर्वांमध्ये विठ्ठल पाहिला हा संदेश अगदी मोलाचा आहे म्हणूनच आजच्या कीर्तनातून महाराजांनी आपणाला सज्ञनाची नावे घेतल्यानंतर पुण्यवंत होता येतं असं उत्कृष्ट प्रकारचे मार्गदर्शनाने आजच्या दिवसाचे कीर्तन पुष्प श्री संत सावता महाराजांच्या चरणी समर्पित केले.